गर्मी में भी सर्दी का मजा
COMPRO Systems & Services
Symphony DAIKIN BLUE STAR VOLTAS Carrier
कुलर, ए.सी., फ्रीज
सुलभ हप्त्यावर उपलब्ध 0% फायनान्स
HDB FINANCIAL SERVICES BAJAJ FINSERV
• वॉशिंग मशिन • एलईडी टीव्ही • होमथिएटर • मोबाईल • होम अप्लायन्सेस
अंबर प्लाझा, एचडीएफसी बँके जवळ, स्टेशनरोड, अ.नगर. मो. ९३२५१०३०५०

संस्थापक कै. आचार्य गुंदेचा

# नवा मराठा

संपादक : सुभाष गुंदेचा — व्यवस्थापक : अनिकेत गुंदेचा

श्री लक्ष्मी मल्टीस्टेट को-ऑप.क्रेडीट सोसायटी लि., अ.नगर
मुख्य कार्यालय : अकोलकर हॉस्पीटल जवळ, बुरुडगांव रोड, अ.नगर फोन : (०२४१) ३५८६६५९
* ठेवीचे व्याजदर *
* ४६ ते ९० दिवस ८%
* ९१ ते ३६५ दिवस ९%
* १ वर्ष व त्यापुढे १०%
* शुभलक्ष्मी दाम दुप्पट ठेव योजना ८४ महिने
* धनलक्ष्मी दैनंदिन बचत ठेव ५ महिने मुदत
* अमृत मासिक ठेव १.१५ लाखास १००० रु. दरमहा व्याज
* कन्या लक्ष्मी १ लाखास ५ लाख रु १८ व्या वर्षी प्राप्त
दैनिक बचत (डेली कलेक्शन) रिकरिंग (आर.डी.) मुदत ठेव (एफ.डी.) → कमिशन एजंट नेमणे आहेत
संस्थापक - अनिल मोहिते
अध्यक्ष - अजय मोहिते

रजि नं. ११४३९-५७/३७ | पाने ८ | किंमत ३ रूपये | अहिल्यानगर, बुधवार दि. २६.०३.२०२५ | अंक नं. ३२५ | वर्ष ६८ वे | दैनिक वर्ष ६२ वे | ANR/022/2018-2020

फक्त फायदाच फायदा !
खरेदीवर पॉइंट पॉइंट्सवर गिफ्ट
विश्वसनीय वस्त्रांची अखंड परंपरा
राजपाल™
संगमनेर (02425) 222226
अ. नगर (0241) 2999299
नारायणगाव (02132) 242132
श्रीरामपूर (02422) 220090

# बाजारपेठेत रस्ता आठवड्यापासून ठेवलाय खोदून, काम मात्र बंदच


ड्रेनेज लाईनच्या कामासाठी खोदून ठेवलेला रस्ता. (छाया-धनेश कटारिया)

## मनपाच्या नियोजन शून्य कारभारामुळे व्यापारी आणि नागरिकांची होतेयं अडचण

नगर - शहरातील मोठ्या वर्दळीची बाजार पेठ असलेल्या डाळ मंडई परिसरातील बंजार गल्ली चौक येथील रस्ता ड्रेनेज लाईनच्या कामामुळे गेल्या पाच दिवसांपूर्वी खोदण्यात आला आहे. मात्र या ड्रेनेज लाईनचे काम कसे करावे हे संबंधित ठेकेदाराला कळत नसल्यामुळे या कामास विलंब होत असून काम बंद आहे. मात्र रस्ता खोदून ठेवल्यामुळे या परिसरात वाहनांची ये जा थांबली असून व्यापारी व नागरिकांना मोठा त्रास सहन करावा लागत आहे.

कायम वर्दळ असणाऱ्या या बाजारपेठ मध्ये अशाप्रकारे दिरंगाईने काम चालल्यामुळे व्यापाऱ्यांच्या गाड्या, मालवाहतूक गाड्या यांना येण्यास अडचण होत असल्याने व्यापाऱ्यांची मोठी अडचण होत आहे. आता गुढीपाडवा आणि रमजान ईद असे दोन महत्वाचे सण जवळ आले आहेत. सण साजरा करण्यासाठी लागणारे वस्तू खरेदी करण्यासाठी नागरिक बाजारपेठेत येतात मात्र अशाप्रकारे रस्ते खोदून ठेवल्यामुळे नागरिकांना हा त्रास सहन करावा लागत आहे. मनपाने तत्काळ लक्ष देऊन काम पूर्ण करुन घेण्याची मागणी होत नागरिकांकडून होत आहे .

राष्ट्रसंत आचार्य श्री आनंदऋषिजी म.सा. यांच्या पुण्यस्मृति दिनानिमित्त आयोजित
आशेची नवी पालवी
मतिमंद व गतिमंद मुलांसाठी
प्रभावी होमिओपॅथी उपचार शिबीर
28 मार्च व 29 मार्च 2025, वेळ : सकाळी 11.00 ते सायं 7.00 पर्यंत
तुमच्या मुलांना जर..
• स्वमग्नता • मानसिक अल्पविकास • आकालन क्षमता कमी असणे • अतिचंचलपणा • योग्य वयात हालचाल न होणे • हातपायचे स्नायु आखडणे • योग्य वयात पालथ न पडणे • बसणे-उठणे-चालणे या क्रियांमध्ये त्रास होणे किंवा क्रिया करता न येणे • इतरांबरोबर मिक्स न होणे • ऑटिझम • डाऊन सिंड्रोम • सेरेब्रल पाल्सी • मोटर न्युरॉन डिसीज • फिटस् येणे, इ. आजारांवर
डॉ. प्रतिमा बोरा यांचे प्रभावी होमिओपॅथी उपचार
हे दिर्घ कालावधीसाठी घेतल्यास चांगला फरक जाणवतो.
होमिओपॅथी उपचार फक्त रु. 200/- दरमहा.
रुग्णांचे सर्व जुने रिपोर्टस बरोबर आणणे.
नाव नोंदणी आवश्यक
CALL : 9822 6465 88
नक्षत्र मेडिकल मागे, चाणक्य चौक, अहिल्यानगर
DR. BORA™ HOMEOPATHY CLINIC
प्रभावी होमिओपॅथीक उपचार

लग्न, शुभकार्यासाठी
इंद्रज्योत लॉन्स
पॅकेज सुविधा उपलब्ध
* लग्नकार्य * साखरपुडा
* स्वागत समारोह
* बर्थ डे पार्टीज
* कॉम्फरन्स हॉल
* मुंजसाठी उपलब्ध
स्वाद केटर्स
स्वादीष्ट जेवणाची खास मेजवानी
सर्वप्रकारच्या जेवणाच्या ऑर्डर स्विकारल्या जातील.
मो.9673097575/9970162727
जीत बजाज शोरुम शेजारी, नगर-छत्रपती संभाजीनगर रोड, शेंडी-पोखर्डी, अहिल्यानगर

सेल्समन/सेल्सगर्ल पाहिजेत
शहरातील नामांकित सराफी पेढीसाठी
सेल्समन/सेल्सगर्ल पदासाठी भरती करणे आहे.
अनुभवी, सुशिक्षित, उत्कृष्ट संभाषण कौशल्य असणाऱ्यांनाच प्राधान्य.
आकर्षक पगार दिला जाईल. संपूर्ण अर्जासह समक्ष भेटावे.
विजय भागिरथ रायमोकर सराफ
सराफ बाजार, अहिल्यानगर. Mo. 9850199991

SONI TILES Since 1965
AND MARBLE INDUSTRIES
Opp. Munot Estate, Station Road, Ahmednagar. Tel. : (0241) 2418720
Mob. 9372497999
Wholesalers & Manufacturers of - Ceramic Wall & Floor Tiles, Vitrified Tiles, Paving Blocks, Marble & Granite
सोनी टाईल्स अँण्ड मार्बल इंडस्ट्रिज

Trust Since 1992
Shivam TVS
TVS
योग आला आहे आपलं स्वप्न पूर्ण करण्याचा !
होय, यंदाच्या गुढीपाडव्याला घरी घेऊन जा आपली आवडती TVS TWO-WHEELER !
इथे आहेत Two-Wheeler खरेदीवर अनेक फायदेशीर ऑफर्स !
पेट्रोल स्कूटर खरेदीवर मिळवा
पैठणी साडी फ्री !* | - कमी डाऊनपेमेंट - ₹5,999/-*
TVS iQube खरेदीवर मिळवा
- कॅशबॅक - ₹20,000/-* | - कमी डाऊनपेमेंट - ₹9,999/-*
5 वर्षांची एक्सटेंडेड वॉरंटी फ्री*
Apache आणि Ronin या बाईक्ससाठी खास ऑफर्स
- सिलेक्टीव प्रीमियम आणि सुपर प्रीमियम बाईक्स खरेदीवर -
- डिस्काउंट - ₹10,000/-* | - कमी डाऊनपेमेंट - ₹14,999/-* | हेल्मेट, वेलकम किट व कोटिंग फ्री.*
TVS Raider खरेदीवर मिळवा
फ्री सनग्लासेस* | - कमी डाऊनपेमेंट - ₹11,999/-* | हेल्मेट, वेलकम किट फ्री*
पोलिस एम्प्लॉयीसाठी सुद्धा इथे स्पेशल ऑफर्स
- कॅश डिस्काउंट - ₹ 1500/- ते 3000/-
तुम्ही या ऑफरचा नक्की लाभ घ्या.
Conditions Apply*
32 वर्षांची विश्वसनीय परंपरा असलेले आणि उत्तम ग्राहकसेवेसाठी प्रसिद्ध असलेले शोरुम !
Spot Exchange | Spot Finance | Spot Delivery
Financial Partners : TVS CREDIT, L&T Financial Services, HDFC BANK, IDFC FIRST Bank, SHRIRAM City
शिवम TVS
झोपडी कॅन्टीन, सावेडी, अहिल्यानगर मोबा. 7796685500/ 9130030003/02/05

जिल्ह्यातील निकडीच्या प्रश्नांना वाचा फोडणारे एकमेव दैनिक
संस्थापक कै. आचार्य गुंदेचा
# नवा मराठा
फोन-२४१४१४१, २४१७७७७
भाडोत्री म्हणून वर्षानुवर्ष जगण्यापेक्षा निर्भिड म्हणून क्षणभर जगण्यात जीवनाचे खरे सार्थक आहे. - कै.आचार्य गुंदेचा
email - navamaratha@gmail.com

## विक्रमादित्याला वेताळचा प्रश्न...

तीन मुले होती. त्यांचे एकाच मुलीवर खूप प्रेम होते. दुर्दैवाने एका आजाराने तिचे निधन होते. त्या ३ प्रेमींपैकी एकजण अत्यंत दुःखी होतो व त्या भरात तो तिच्या चितेत उडी घेतो. त्याचाही देह जळू लागतो.

दुसरा प्रेमी स्मशानातून बाहेर पडायला नकार देतो, तिथेच बसून राहतो; तर तिसरा प्रेमी त्या मुलीला जिवंत करण्यासाठी जादूटोणा, चेटूक शिकतो आणि अहो आश्चर्यम्, तो तिला पुन्हा जिवंत करण्यास यशस्वी होतो पण तिच्यासोबत तिच्या चितेत उडी घेणारा तो पहिला प्रेमीही जिवंत होतो.

आता वेताळ विचारतो, ''ती मुलगी तिन्ही प्रेमींसह उभी आहे. जर तू विक्रमादित्य असशील तर मला सांग, ती मुलगी या तिन्हीपैकी कुणाशी लग्न करेल?''

वाचनीय मननीय प्रेरणादायी अक्षरधन
संकलन : "मुसाफिर"-९८२२०२०६९१



त्यावर राजा विक्रमादित्य थोडा विचार करून उत्तर देतो, ''जो माणूस स्मशानात थांबला होता, त्याच्याशी ती लग्न करेल. कारण ज्या माणसानं तिला जिवंत केलं तो आता तिच्या पित्यासमान आहे. जो माणूस तिच्या सोबत जिवंत झाला तो तिच्या भावासमान आहे. त्यामुळे जो माणूस स्मशानात थांबला होता त्याच्याशीच तिनं लग्न करावं.''

४-५ दशकांपूर्वी लहान मुलांच्या प्रबोधनासाठी 'चांदोबा' मासिक यायचे. वरील गोष्टीने त्या दिवसांचे स्मरण झाले.



वीर जवान रामदास बढे यांना शासकीय इतमामात अखेरचा निरोप देण्यात आला.

# शहीद जवान रामदास बढे यांना शासकीय इतमामात अखेरचा निरोप

शिर्डी - जम्मू-काश्मीरमधील भारत-पाकिस्तान नियंत्रण रेषेवर कर्तव्यावर असताना शहीद झालेले संगमनेर तालुक्यातील मेंढवन गावचे सुपुत्र रामदास साहेबराव बढे यांच्यावर त्यांच्या गावी शासकीय इतमामात अंत्यसंस्कार करण्यात आले. हजारो नागरिकांनी साश्रूनयनांनी त्यांना अखेरचा निरोप दिला. राज्य शासन आणि जिल्हा प्रशासनाच्यावतीने जिल्हाधिकारी पंकज आशिया यांनी पार्थिवावर पुष्पचक्र अर्पण करून श्रद्धांजली वाहिली.

रामदास साहेबराव बढे (वय ४४) लष्कराच्या ३४ एफडी रेजिमेंटमध्ये हवालदार पदावर कार्यरत होते. तंगधार सेक्टरमध्ये सोमवारी (दि. २४ मार्च) कर्तव्य बजावत असताना रामदास बडे यांना वीरमरण आले. आज (दि.२६ मार्च) सकाळी त्यांचे पार्थिव मेंढवन येथे आणण्यात आले. लष्कर आणि स्थानिक प्रशासनाच्या उपस्थितीत शासकीय इतमामात अंत्यसंस्कार पार पडले.

भारतीय लष्कराच्या मराठा फिल्ड रेजिमेंट व पोलिसांच्या पथकांनी हवेत बंदुकीच्या फैरी झाडून त्यांना मानवंदना दिली. 'भारत माता की जय' आणि 'शहीद रामदास बढे अमर रहें' अशा घोषणांनी परिसर दणाणून गेला होता. मुलगा ऋषिकेश व भाऊ संदीप यांनी त्यांच्या पार्थिवाला मुखाग्नी दिला. माजी मंत्री बाळासाहेब थोरात, उपविभागीय अधिकारी शैलेश हिंगे, पोलीस उपअधीक्षक डॉ.कुणाल सोनवणे, तहसीलदार धीरज मांजरे, जिल्हा सैनिक कल्याण अधिकारी विद्यासागर कोरडे, निलम खताळ, लष्कराच्यावतीने मेजर आर.व्ही.राठोड, तसेच इतर मान्यवरांनी पुष्पचक्र अर्पण करून शहीद बढे यांना श्रद्धांजली वाहिली.

''रामदास बढे यांनी देशासाठी दिलेले बलिदान आम्हा सर्वांसाठी प्रेरणादायी आहे. त्यांच्या कुटुंबीयांच्या दु:खात प्रशासन सहभागी असून कुटुंबीयांना शासन सर्वतोपरी मदत करेल'' अशा शब्दात जिल्हाधिकारी श्री.आशिया यांनी आपल्या भावना व्यक्त केल्या. शैलेश हिंगे, बाळासाहेब थोरात यांनीही यावेळी आपल्या भावना व्यक्त केल्या.

हवालदार रामदास बढे हे वयाच्या २० व्या वर्षी सैन्य दलात भरती झाले होते. त्यांनी पश्चिम बंगाल, आसाम, सिक्कीम, जम्मू -काश्मीर व महाराष्ट्र या राज्यात सेवा बजावली होती. त्यांच्या पश्चात आजी, आई, पत्नी, मुलगा, मुलगी व भाऊ असा परिवार आहे.

## धारदार तलवार बाळगुन फिरणाऱ्या दोघांना पकडले

नगर - काहीतरी गंभीर स्वरूपाचा गुन्हा करण्याच्या उद्देशाने धारदार तलवार घेऊन दुचाकीवरुन फिरणाऱ्या दोघांना कोतवाली पोलिसांनी ताब्यात घेऊन त्यांच्याकडील धारदार तलवारीसह दुचाकी जप्त केली. ही कारवाई २५ मार्च रोजी सायंकाळी साडेचार वाजण्याच्या सुमारास संजय नगर, काटवन खंडोबा येथे करण्यात आली आहे.

कोतवाली पोलीस शहरांमध्ये पेट्रोलिंग गस्त करीत असताना पोलीस अंमलदार दीपक रोहकले यांस माहिती मिळाली की संजय नगर काटवन खंडोबा येथे एक तरुण शर्टामध्ये पाठीमागील बाजूस धारदार शस्त्र लावून मोपेड गाडीवर फिरत आहे. अशी माहिती मिळाल्याने कोतवाली पोलीस तात्काळ त्या ठिकाणी गेले असता रोडच्या बाजूला दोन तरुण एक्सेस मोपेड (क्र एम एच १६ सी एक्स ३९९६) गाडी वर बसलेले दिसले. पोलिसांना पाहताच ते पळू लागले असता पोलिसांनी त्यांना तात्काळ ताब्यात घेतले. त्यांची नावे सुदेश आनंद बोटे (वय १९, रा. अंबर कॉलनी, माळीवाडा, अ.नगर) प्रवीण सुनील जाधव (वय २१, रा. किनारा हॉटेल जवळ, शेंडी बायपास, अ.नगर) असे असल्याचे त्यांनी सांगितले. पोलिसांनी त्यांची झडती घेतली असता सुदेश बोटे यांच्या शर्ट च्या पाठीमागील बाजूस लोखंडी धारदार तलवार मिळून आली. पोलिसांनी त्यांच्याकडील एक्सेस मोपेड गाडी व तलवार जप्त केली.

याप्रकरणी कोतवाली पोलीस ठाण्यात पो.कॉ. सचिन लोळगे यांनी दिलेल्या फिर्यादीवरुन सुदेश बोटे व प्रवीण जाधव यांच्याविरुद्ध भारतीय शस्त्र अधिनियम १९५९ चे कलम ४/२५ अन्वये गुन्हा दाखल केला आहे.

# साईनगर येथील बंगल्यावर दरोड्याच्या प्रयत्नातील ५ सराईत गुन्हेगार तरुणांना पोलिसांनी केली अटक

## स्थानिक गुन्हे अन्वेषण शाखेच्या पथकाने केली कारवाई



बुरुडगाव रोड वरील साईनगर येथे योगेश चंगेडीया यांच्या घरावर दरोडा टाकण्याचा प्रयत्न करणाऱ्या टोळीला पकडल्या नंतर त्यांच्या समवेत स्थानिक गुन्हे शाखेचे पथक.

नगर - बुरुडगाव रोड वरील साईनगर येथील योगेश चंगेडीया यांचे घरावर सशस्त्र दरोडा टाकण्याचा प्रयत्न करणाऱ्या ५ जणांच्या टोळीच्या मुसक्या स्थानिक गुन्हे शाखेच्या पथकाने २५ मार्च रोजी आवळल्या आहेत. या टोळीतील सर्वजण नगरमधील असून ते सराईत गुन्हेगार असल्याचे समोर आले आहे.

सागरसिंग बलबीरसिंग जुन्नी, (वय २५, रा.संजयनगर, काटवन खंडोबा), गोपाल राजू नायडू, (वय ३४, रा.संजयनगर, काटवन खंडोबा), सोनू शरद शिंदे, (वय २९, रा.भोसले आखाडा), सोनूसिंग रणजितसिंग जुन्नी, (वय २१), सतनामसिंग जीतसिंग जुन्नी (वय २३, दोघे रा. संजयनगर, काटवन खंडोबा रोड) अशी या आरोपींची नावे आहेत.

बुरूडगाव रोडवरील साई नगर येथे राहणारे व्यावसायिक योगेश श्रीकांत चंगेडीया, (वय ४५) यांचे राहते घराचे खिडकीचे शटर कटरच्या सहाय्याने तोडण्याचा प्रयत्न करून दरोड्याचा प्रयत्न २२ मार्चला पहाटे करण्यात आला होता. मात्र चंगेडीया कुटुंब जागे झाल्याने आणि त्यांनी शेजारच्या लोकांना फोन करून जागे करत आरडाओरडा केल्याने दरोडेखोर पळून गेले होते. याबाबत कोतवाली पोलीस ठाण्यात बीएनएस २०२३ चे कलम ३०९ (५) प्रमाणे गुन्हा दाखल करण्यात आलेला आहे.

या संदर्भात २ दिवसांपूर्वी बुरूडगाव रोड परिसरातील रहिवासी नागरिक व व्यापाऱ्यांनी आ.संग्राम जगताप, माजी उपमहापौर गणेश भोसले यांच्या समवेत पोलीस अधिक्षक राकेश ओला यांची भेट घेत साई नगर परिसरात गेल्या ६ महिन्यांपासून सुरु असलेल्या चोऱ्या, घरफोड्यांचा तपास लावावा अशी मागणी केली होती. त्यामुळे पोलिस अधिक्षक ओला यांनी या गुन्हयांचा समांतर तपास करून गुन्हे उघडकीस आणण्याबाबतचे आदेश स्थानिक गुन्हे शाखेचे पोलिस निरीक्षक दिनेश आहेर यांना दिले होते.त्यानुषंगाने पोलीस निरीक्षक दिनेश आहेर यांनी स्थानिक गुन्हे शाखेतील पोलिस उप निरीक्षक तुषार धाकराव व पोलीस अंमलदार संदीप पवार, गणेश धोत्रे, गणेश लोंढे, शाहीद शेख, फुरकान शेख, रविंद्र घुंगासे, अमृत आढाव, मयूर गायकवाड, जालींदर माने, विशाल तनपुरे, किशोर शिरसाठ, मेघराज कोल्हे व प्रशांत राठोड यांचे पथक नेमुन गुन्ह्यातील आरोपींची माहिती व शोध घेणेबाबत पथकास रवाना केले.

पथक कोतवाली पोलीस ठाण्याच्या हद्दीत नमूद गुन्हयातील आरोपींचे सीसीटीव्ही फुटेज व तांत्रीक विश्लेषणाच्या आधारे तपास करत असताना हा गुन्हा सागरसिंग जुन्नी याने त्याचे साथीदारासह केल्याचे समोर आले. पथकाने निष्पन्न आरोपीचा शोध घेऊन सागरसिंग बलबीरसिंग जुन्नीयास ताब्यात घेतले. त्यास त्याचे साथीदाराबाबत विचारपूस केली असता त्याने साथीदारांची नावे सांगितली. त्यानुसार पथकाने इतर आरोपींचा नगर शहरामध्ये शोध घेऊन गोपाल नायडू, सोनू शिंदे, सोनूसिंग जुन्नी, सतनामसिंग जुन्नी या चौघांना ताब्यात घेतले.

### कल्याण रोड येथून चोरली होती मारुती इको गाडी

ताब्यातील आरोपीतांना विश्वासात घेऊन गुन्हयांचे अनुषंगाने विचारपूस करता त्यांनी गुन्हा केल्याची माहिती सांगीतली. तसेच ताब्यातील आरोपीकडे त्यांनी गुन्हयात वापरलेली मारुती कंपनीची इको गाडीबाबत विचारपूस केली असता गुन्हयातील इको गाडी ही जाधव पेट्रोलपंप कल्याण रोड येथून चोरी केली असल्याची माहिती सांगितली. आरोपींनी इको गाडीबाबत सांगीतलेल्या माहितीवरुन कोतवाली पोलीस ठाण्याचे अभिलेखाची पडताळणी केली असता त्याबाबत कोतवाली पोलीस ठाण्यात वाहन चोरीचा गुन्हा दाखल असल्याचे समोर आले. ताब्यातील आरोपींना गुन्ह्याचे तपासकामी कोतवाली पोलीस ठाण्यात हजर करण्यात आले आहे.

# दुचाकीच्या डिक्कीतून सोन्याच्या बिस्किटाची चोरी; आगरकर मळा येथील घटना

नगर - दुचाकीच्या डिक्कीमध्ये ठेवलेले १५ ग्रॅम वजनाचे सोन्याचे बिस्किट कोणीतरी अज्ञात चोरट्याने चोरून नेल्याची घटना स्टेशन रोडवरील आगरकर मळा येथील एकता कॉलनी येथे घडली आहे.अज्ञात चोरट्याने पाळत ठेवून ही चोरी केली असावी असा संशय पोलिसांनी व्यक्त केला असून त्या दृष्टीने तपास सुरु केला आहे.

याबाबत अशोकदास लक्ष्मणदास दुबे (वय ६५, रा. एकता कॉलनी, आगरकर मळा, स्टेशनरोड, अ.नगर) यांनी कोतवाली पोलिस ठाण्यात फिर्याद दिली आहे. फिर्यादी दुबे यांनी चिंतामण रामचंद्र देशमुख अँड सन्स या सराफ दुकानातून १५ ग्रॅम वजनाचे सोने खरेदी केले होते. ते सोने त्यांनी दोन दिवस घरी ठेवले होते. १३ फेब्रुवारी रोजी दुपारी १२ वाजण्याच्या सुमारास दुबे यांनी त्यांच्या घरातील १५ ग्रॅम वजनाचे सोन्याचे बिस्किट घरासमोर असलेल्या होंडा कंपनीच्या एक्टिवा मोपेड गाडीच्या (क्र. एम एच १६ सी आर ८४५२) डिक्की मध्ये ठेवून सोने खरेदी केल्याची पावती आणण्याकरिता ते घरात गेले.

घरात जाऊन पावती घेऊन ते पुन्हा गाडी जवळ येऊन चिंतामण देशमुख अँड सन्स या दुकानांमध्ये गेले व त्यांनी गाडीची डिकी पाहिली असता गाडीचे डिक्की मध्ये त्यांनी ठेवलेले सोन्याचे बिस्किट दिसून आले नाही. त्यानंतर त्यांनी पुन्हा घरी जाऊन ज्या ठिकाणी गाडी उभी केली. त्या ठिकाणी पाहणी केली असता त्यांना काही एक दिसून आले नाही. यावरुन त्यांची खात्री झाली की ते घरात जात असताना गाडीची डिकी उघडी होती. तेव्हा कोणीतरी अज्ञात चोरट्याने पाळत ठेवून गाडीचे डिक्कीतील १ लाख ३० हजार रुपये किमतीचे १५ ग्रॅम वजनाचे सोन्याचे बिस्किट चोरुन नेले. मात्र ते आणि काही दिवस त्यांच्या कुटुंबातील सदस्य आजारी असल्याने त्यांनी २५ मार्चला कोतवाली पोलिस ठाण्यात जावून फिर्याद दिली. या फिर्यादीवरुन कोतवाली पोलिसांनी अज्ञात चोरट्याविरुद्ध भारतीय न्याय संहिता २०२३ चे कलम ३०५ (क) अन्वये चोरीचा गुन्हा दाखल केला आहे.

## सौ.अनघा चावरे यांचे अल्पशा आजाराने निधन

नगर - अहिल्यानगर बुरुडगाव येथील रहिवासी सौ. अनघा चावरे (वय ५९) यांचे अल्पशा आजाराने नुकतेच निधन झाले आहे. नालेगाव येथील जनकल्याण रक्तकेंद्रात त्या नोकरी करत होत्या. वैकुंठ स्मशानभूमी पुणे येथे त्यांच्या पार्थिवावर अंत्यसंस्कार करण्यात आले. त्या अत्यंत मनमिळावू व धार्मिक स्वभावाच्या होत्या. त्यांच्या पश्चात पती संदीप पद्माकर चावरे, भाऊ निमिष जोशी, आरोही, जान्हवी या दोन मुली, जावई असा परिवार आहे.



## सौ.विजयाबेन पटेल यांचे अल्पश: आजाराने निधन



श्रीरामपूर - येथील सौ. विजयाबेन शिवजीभाई पटेल (वय ७०) यांचे अल्पश: आजाराने निधन झाले. त्या श्रीराम ऑटो स्कॅनचे मालक प्रवीण पटेल यांच्या मातोश्री, शिवजीभाई विश्राम पटेल यांच्या पत्नी, आशिष प्रवीण पटेल यांच्या आजी होत.



**हनुमान चालिसा पाठ**
**गुरुवार दि. २७/०३/२०२५**
**रात्री ८.३० ते १०.३०**

**श्री दक्षिणमुखी हनुमान सत्संग मंडळ, सर्जेपुरा, अहिल्यानगर**
**सह्योग प्रतिष्ठान मित्र मंडळ,** प्लेझेंट पार्क शेजारी, सारसनगर, राजेंद्र आवारे- ९४२२२२२३७३, संजय आवारे- ९४२२०८०३६६

**मंगल भक्त सेवा मंडळ, मंगल दत्तक्षेत्र, एमआयडीसी, अहिल्यानगर**
**रोह्ला डेकोरेटर्स,** श्रमिकनगर, बालाजी मंदिर, सावेडी विजय रोह्ला, मो. ९७६३२६३१९७.

**श्रीराम भक्त हनुमान सत्संग मंडळ (ट्रस्ट) श्रीराम मंदिर, नवीपेठ**
**बागडपट्टीचा राजा प्रतिष्ठान (ट्रस्ट)**
अध्यक्ष- दिलदारसिंग बीर श्री हनुमान तालीम, बागडपट्टी

**श्री संकटमोचन हनुमान सत्संग मंडळ, अहिल्यानगर**
**कृष्णा फल्ले, कै. सविता कृष्णा फल्ले स्मरणार्थ,** रवि फल्ले, पाटील गल्ली, भिंगार

**श्री लक्ष्मीनारायण सत्संग मंडळ, सारडा गल्ली, गंजबाजार**
**श्री रामकृष्ण हौसिंग सोसायटी,** महेशनगर, जुन्या आरटीओ ऑफिसच्या जवळ, मो. ९२२५१२२१५१

# एमपीडीए कायद्यान्वये सराईत गुन्हेगार विजय पठारे स्थानबद्ध

## जिल्हाधिकाऱ्यांनी मंजुरी देताच पोलिसांनी नाशिक कारागृहात केली रवानगी



सराईत गुन्हेगार विजय पठारे याच्याविरुद्ध एमपीडीए प्रस्ताव मंजूर होताच त्याला ताब्यात घेतल्यानंतर तोफखाना पोलिसांचे पथक.

नगर - अगामी सण उत्सव शांततेत पार पडावेत याकरिता शहरातील धोकादायक गुन्हेगार असलेला विजय राजु पठारे (रा. सिद्धार्थनगर, अ.नगर) याच्यावर एमपीडीए कायद्यान्वये स्थानबद्धतेची कारवाई करण्यात आली आहे. जिल्हाधिकारी डॉ.पंकज आशिया यांनी याबाबतचा प्रस्ताव मंजूर करताच तोफखाना पोलिसांनी विजय पठारे याची २५ मार्च रोजी नाशिकच्या मध्यवर्ती कारागृहात रवानगी केली आहे.

सराईत गुन्हेगार विजय पठारे हा समाजात धोकेदायक ठरत असल्याने पोलीस अधीक्षक राकेश ओला, अप्पर पोलीस अधिकारी प्रशांत खैरे, शहर विभागाचे पोलीस उपअधीक्षक अमोल भारती यांच्या मार्गदर्शनाखाली तोफखाना पोलिसांनी विजय पठारे यांच्या विरुद्ध एमपीडीए प्रस्ताव तयार करून जिल्हा दंडाधिकारी यांच्याकडे मंजुरी साठी पाठविला होता. या प्रस्तावावर २५ मार्च रोजी जिल्हा दंडाधिकारी डॉ. पंकज आशिया यांनी हद्दपार विजय पठारे यास स्थानबद्ध करण्याचे आदेश पारित केले. विजय पठारे यांच्याविरुद्ध तोफखाना पोलीस ठाण्यात गंभीर स्वरूपाचे ११ गुन्हे दाखल असून भिंगार कॅम्प पोलीस ठाण्यात एका गुन्ह्याची नोंद आहे.

जिल्हा दंडाधिकारी यांचे आदेश प्राप्त होताच पोलीस अधीक्षक राकेश ओला, अपर पोलीस प्रशांत खैरे, पोलीस उप अधीक्षक अमोल भारती यांच्या मार्गदर्शनाखाली तोफखान्याचे पोलीस निरीक्षक आनंद कोकरे, पोलीस उपनिरीक्षक शैलेश पाटील, पोलीस अंमलदार योगेश चव्हाण, भानुदास खेडकर, सुनील शिरसाठ, विनोद गिरी, सतीश त्रिभुवन, सुजय हिवाळे यांच्या पथकाने विजय पठारे यास ताब्यात घेऊन त्याची स्थानबद्धतेकरिता मध्यवर्ती कारागृह नाशिक येथे रवानगी केली आहे.

# दागिने घडविण्यासाठी दिलेले सोने घेवून कारागीर पसार

## सराफ व्यावसायिकाची झाली ९ लाखांची फसवणूक, आरोपीविरुद्ध गुन्हा दाखल

नगर - सोने घडवण्याचे व दुरुस्तीचे काम करणाऱ्या परप्रांतीय सुवर्ण कारागिराकडे शहरातील सराफ व्यावसायिकाने विश्वासाने दागिने करण्यासाठी दिलेले ८ लाख ९९ हजार ८६० रुपये किमतीचे सोने परत न देता त्यांची फसवणूक केल्याचे समोर आले आहे. ही घटना १४ एप्रिल २०२४ ते २४ फेब्रुवारी २०२५ दरम्यान सराफ बाजार येथील एस व्ही बुऱ्हाडे ज्वेलर्स दुकानात घडली.

या बाबत सराफ व्यावसायिक विशाल प्रमोद बुऱ्हाडे (वय ३९, रा. गुलमोहर रोड, आनंद शाळेसमोर, सावेडी, अ. नगर) यांनी दिलेल्या फिर्यादीत म्हटले आहे की तपन गौर बेरा हा बंगाली सोने कारागीर ओळखीचा असल्याने बुऱ्हाडे हे त्यांच्या दुकानाचे सोन्याचे दागिने घडवण्याचे विश्वासाने देत होते. १४ एप्रिल २०२४ पासून वेळोवेळी सोने कारागीर तपन गौर बेरा यास ४०७ ग्रॅम ९१० मिली २४ कॅरेटचे सोने वेगवेगळे दागिने बनवण्याकरता दिले होते. त्यापैकी ८ फेब्रुवारी २०२५ पर्यंत त्याने एकूण ३१७ ग्रॅम ८५७ मिली सोन्याचे दागिने तयार करून दिले होते. त्या सोन्यापैकी बाकी असलेले ९० ग्रॅम ५० मिली सोन्याचे दागिने त्याने अद्याप पर्यंत तयार करून बुऱ्हाडे यांना दिले नाही. तसेच २४ फेब्रुवारी २०२५ रोजी बुऱ्हाडे यांनी ग्राहकाची ३५ ग्रॅम ७८० मिली वजनाची सोन्याची चेन दुरुस्तीकरीता दिली होती. ती चेन देखील कारागिराने अद्याप पर्यंत दुरुस्त करून दिली नाही.

याबाबत बुऱ्हाडे यांनी फोनवरून कारागीरास वेळोवेळी विचारणा केली असता त्याने आज देतो उद्या देतो असे उडवाउडवीचे उत्तरे दिली. त्यानंतर बुऱ्हाडे हे कारागिराच्या घरी तोफखाना येथे गेले असता तो घरी मिळून आला नाही. तो बाहेरगावी गेला असल्याचे समजले. त्यानंतर तपन बेरा याच्याशी वेळोवेळी फोनवरुन संपर्क करण्याचा प्रयत्न केला परंतु संपर्क होऊ शकला नाही. यावरुन बुऱ्हाडे यांची खात्री झाली की तपन बेरा याने ५ लाख ८५ हजार रुपये किमतीचे ९० ग्रॅम ५० मिली वजनाचे २४ कॅरेट सोने, ३ लाख १४ हजार ८६० रुपये किमतीचे २२ कॅरेटचे ३५ ग्रॅम ७८० मिली ग्रॅम वजनाची सोन्याची चेन अशी ८ लाख ९९ हजार ८६० रुपयांची फसवणूक केली.

या प्रकरणी कोतवाली पोलिसांनी विशाल बुऱ्हाडे यांनी दिलेल्या फिर्यादीवरुन आरोपी तपन बेरा याच्या विरुध्द फसवणुकीचा गुन्हा दाखल केला आहे.

# रस्त्याच्या वादातून मारहाण करत जीवे मारण्याचा प्रयत्न; गुन्हा दाखल

नगर - सामायिक रस्त्याच्या वादातून तिघांनी लाकडी दांडके, लोखंडी रॉडने बेदम मारहाण करत जीवे मारण्याचा प्रयत्न केल्याची घटना नगर तालुक्यातील गुंडेगाव शिवारात असलेल्या तुकाई मळा येथे २५ मार्चला सकाळी ९ च्या सुमारास घडली आहे. या मारहाणीत एका महिलेसह तिघे जखमी झाले असून त्यांच्यावर नगर मधील रुग्णालयात उपचार करण्यात येत आहेत.

याबाबत अंजली आजिनाथ जाधव (वय २८, रा.गुंडेगाव, ता.नगर) यांनी नगर तालुका पोलिस ठाण्यात फिर्याद दिली आहे. या मध्ये म्हंटले आहे की, यातील आरोपी अनिल गेनबा भापकर, पंडित गेनबा भापकर, गेनबा सोनबा भापकर (सर्व रा. तुकाई मळा, गुंडेगाव) हे आणि फिर्यादी हे तुकाई मळा परिसरात जवळ जवळ राहतात. त्यांच्यात सामायिक रस्त्यावरून वाद आहेत. फिर्यादी यांचे सासरे छबुराव जाधव हे २५ मार्च रोजी सकाळी ९ च्या सुमारास सामायिक रस्त्याने जात असताना यातील आरोपी अनिल भापकर याने त्यांना शिवीगाळ केली.

त्यांनी याबाबत विचारणा केली असता त्याने व इतर आरोपींनी हातात लाकडी दांडके, लोखंडी रॉड घेवून येत त्यांना बेदम मारहाण केली. ही मारहाण सुरु असता त्यांना वाचविण्यासाठी गेलेले फिर्यादीचे पती आजिनाथ जाधव व सासू निर्मला जाधव यांनाही आरोपींनी बेदम मारहाण करत आज यांना जिवंत सोडायचे नाही असे म्हणत शिवीगाळ करत मारहाण करत राहिले. फिर्यादी या तेथे गेल्या असता त्यांनाही धक्काबुक्की करण्यात आली. त्यामुळे फिर्यादी या लांब पळून जात त्यांनी त्यांच्या कडील मोबाईल मध्ये या मारहाणीचे व्हिडीओ काढायला लागल्यावर आरोपी तेथून पळून गेले.

या बेदम मारहाणीत आजिनाथ जाधव, निर्मला जाधव व छबुराव जाधव हे गंभीर जखमी झाले. त्यांना उपचारासाठी नगर च्या रुग्णालयात हलविण्यात आले. त्यानंतर सायंकाळी अंजली जाधव यांच्या फिर्यादी वरून तिघांच्या विरुद्ध खुनाचा प्रयत्न केल्याचा गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

गुन्हा दाखल झाल्यावर पोलिसांनी आरोपी अनिल गेनबा भापकर याला रात्री उशिरा अटक केली आहे.

मालक, मुद्रक, प्रकाशक, संपादक सुभाष चंदनमल गुंदेचा यांनी नवा मराठा मुद्रणालय, आचार्य गुंदेचा चौक, अहिल्यानगर येथे हे पत्र छापून येथेच प्रसिद्ध केले.



सावेडी रोडवरील क्यू वुमन्स प्राइड या नामांकित कंपनीच्या वस्त्रदालनाचा शुभारंभ आमदार संग्राम जगताप यांच्या हस्ते झाला.

# नवनवीन ब्रॅण्डच्या शोरुममुळे नगरच्या अर्थकारणाला बळकटी

### आ.संग्राम जगताप यांचे प्रतिपादन; सावेडी रोडवरील 'क्यू वुमेन्स प्राईड' वस्त्रदालनाचा शुभारंभ

नगर – अहिल्यानगर शहराचा वेगाने विकास होत आहेत. नवनवीन वसाहती वाढत असतानाच विविध व्यावसायिक दुकाने, शॉपिंग सेंटरची भर पडत आहे. शहरातील कापड बाजार पूर्वीपासूनच प्रसिद्ध आहे. दर्जेदार आणि ब्रॅण्डेड कपडे खरेदी आता शहरातच करता येत आहे. क्यू वुमन्स प्राइड या नामांकित कंपनीचे वस्त्रदालन सावेडी रोडवर खुले झाले आहे. याठिकाणी महिला भगिनींना चोखंदळपणे मनपसंत खरेदी करता येईल. अशा नवनवीन ब्रॅण्डच्या शोरूममुळे नगरच्या अर्थकारणाला बळकटी येईल तसेच रोजगार निर्मिती होईल, असा विश्वास आमदार संग्राम जगताप यांनी व्यक्त केला.

सावेडी रोडवरील क्यू वुमन्स प्राइड या नामांकित कंपनीच्या वस्त्रदालनाचा शुभारंभ आमदार संग्राम जगताप यांच्या हस्ते झाला.

याप्रसंगी धीरज कोठारी, सुरज कोठारी, सिद्धार्थ कोठारी, ऋषभ कोठारी, राजेंद्र भंडारी (नाशिक), ईश्वर भंडारी, सनी भंडारी, वैभव भंडारी, सागर गुगळे, विनोद गुगळे, सौरभ गुगळे, मयूर गुगळे, राहुल मुनोत, सचिन कोठारी, रितेश कोठारी, गौतम मुथा, हर्षल गुंदेचा, दिनेश ओस्तवाल आदी उपस्थित होते.

धीरज कोठारी यांनी सांगितले की, क्यू वुमेन्स प्राईड ब्रॅण्ड देशभरात उच्च दर्जासाठी प्रसिद्ध आहे. युवती, महिलांसाठी सर्व प्रकारचे, आधुनिक फॅशनचे कपडे येथे उपलब्ध आहेत. एथेनिक वेअर, विविध सणवार, समारंभासाठी विशेष व्हरायटी आणि दर्जेदार फॅब्रिक या ब्रॅण्डचे वैशिष्ट्ये आहे. प्रत्येक खरेदीवर आकर्षक सवलतही देण्यात येते. नगरमध्ये प्रथमच या ब्रॅण्डचे शोरुम सुरू झाले आहे. त्यामुळे महिला ग्राहकांनी आवर्जून शोरूममध्ये येऊन खरेदीचा आनंद घ्यावा असे आवाहन कोठारी यांनी केले आहे.

# महाबौद्धि बुद्धविहारचे नियंत्रण व व्यवस्थापन बौद्धांच्या ताब्यात देण्याच्या मागणीसाठी मोर्चा

### बोधगया महाविहार कायदा १९४९ चा अन्यायकारक कायदा रद्द करा : 'भारत बंद' करण्याचा केंद्र सरकारला दिला इशारा

नगर – बिहारमधील महाबौद्धि बुद्धविहारचे नियंत्रण आणि व्यवस्थापन बौद्धांच्या ताब्यात देण्याच्या मागणीसाठी शहरातून २५ मार्च रोजी दुपारी मोर्चा काढण्यात आला. यात बौद्ध समाजातील बांधवांसह महिला देखील सहभागी झाल्या होत्या. याच्या माध्यमातून केंद्र सरकारला बौद्ध समाजाच्या वतीने भारत बंदचा इशारा देण्यात आला आहे.



बिहारमधील महाबौद्धि बुद्धविहारचे नियंत्रण आणि व्यवस्थापन बौद्धांच्या ताब्यात देण्याच्या मागणीसाठी शहरातून मोर्चा काढण्यात आला.

मार्केटयार्ड चौकातील भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या पुतळ्यास पुष्पहार अर्पण करुन या मोर्चाचे प्रारंभ करण्यात आले. जुने बसस्थानक येथील छत्रपती शिवाजी महाराज व माळीवाडा येथील महात्मा फुले यांच्या पुतळ्यास पुष्पहाराने अभिवादन करुन मोर्चाचे पुढे मार्गक्रमण झाले. बौद्ध धर्माची अस्मिता असलेल्या महाबौद्धि बुद्धविहार बौद्धांच्या ताब्यात मिळण्यासाठी व बोधगया महाविहार कायदा १९४९ चा अन्यायकारक कायदा रद्द करण्यासाठी समाजबांधवांनी घोषणाबाजी केली. मोर्चात बौद्ध धर्माचे प्रतिक असलेले पंचशील ध्वजासह महाबौद्धि बुद्धविहार बौद्धांच्या ताब्यात देण्याचे फलक हातात घेण्यात आले होते. मोर्चातील रथात भगवान बुद्ध व भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या पुतळ्यासह भन्ते व भिक्खू उपस्थित होते.

माळीवाडामार्गे पंचपीर चावडी, माणिक चौक, कापड बाजार, चितळे रोड व दिल्ली गेट येथून सिद्धीबाग येथील बुद्धविहारात या मोर्चाचा समारोप सभेतून झाला. यावेळी विविध आंबेडकरी चळवळीतील पक्ष, सामाजिक संघटनांचे पदाधिकारी व कार्यकर्ते देखील उपस्थित होते. यावेळी प्रमुख पदाधिकाऱ्यांनी आपल्या भाषणातून बिहार मधील महाबौद्धि बुद्धविहारचे नियंत्रण आणि व्यवस्थापन बौद्धांच्या ताब्यात देण्याची मागणी लावून धरली.

सम्राट अशोक यांनी इ.स. पूर्व तिसऱ्या शतकात महाबोधी महाविहाराचे बांधकाम केले. तथागत बुद्धाला ज्या बोधीवृक्षाखाली ज्ञानप्राप्ती झाली तो बोधीवृक्ष याच महाबोधी महाविहार परिसरात आहे. त्यामुळे देशातील नव्हे, तर जगभरातील बौद्ध अनुयायी भिक्खू आणि पर्यटक या स्थळाला भेट देतात; मात्र या महाविहाराचे नियंत्रण आणि व्यवस्थापन आजही बौद्धांच्या ताब्यात नाही. महाबोधी विहार बौद्धांच्या ताब्यात देण्यात यावे, यासाठी १९९२ पासून आंदोलन होत आहेत. तरी सुद्धा महाबोधी विहार व्यवस्थापन कायदा बदलण्यात आला नाही. त्यामुळे पाच हिंदू धर्मीय यांचे प्राबल्य असल्याने बौद्ध गया येथील महाविहारात पुजा आणि कर्मकांड सुरु आहे. मात्र बौद्ध धर्म गुरुंना त्यांच्या विधीप्रमाणे पूजेचा अधिकार मिळत नाही. ज्या रूढी परंपरांना तथागत गौतम बुद्ध यांनी नाकारले तेच कर्मकांड येथे सुरू असल्याचा आरोप करण्यात आला आहे.

भारतीय राज्यघटनेचे कलम १३ नुसार घटना लागू होण्यापूर्वी केलेले सर्व कायदे आणि नियम निरस्त केले आहेत. मात्र तरी देखील देशात १९४९ चा नियमबाह्य कायदा लावून बौद्ध समूहाचे धार्मिक अधिकार काढून घेण्यात आले असल्याचे बौद्ध समाजाच्या वतीने स्पष्ट करण्यात आले.

महाबोधी महाविहार (बोधगया, बिहार) हे पवित्र बौद्ध धर्मस्थळ असून, बोधगया महाविहार कायदा १९४९ चा अन्यायकारक कायदा रद्द करावा, बोधगया येथील महाबोधी महाविहाराचे नियंत्रण आंतरराष्ट्रीय बौद्धांना सोबत घेऊन बौद्धांच्या ताब्यात द्यावे, जागतिक वारसा अबाधित ठेवण्यासाठी मोठ्या प्रमाणात विशेष विकास निधी आणि सुविधा तात्काळ देण्यात याव्या, केंद्र सरकार आणि बिहार सरकारने आपले विशेष अधिकार वापरून १९४९ चा कायदा दुरुस्त करण्याचे आदेश देण्याची मागणी करण्यात आली आहे.

# पतसंस्थेविरोधात फसवणुकीचा गुन्हा दाखल करण्याची मागणी न्यायालयाने फेटाळली

नगर – महेश नागरी सहकारी पतसंस्था मर्या. यांच्याविरूध्द व त्यांच्या संचालकांविरूध्द फसवणूकीची फिर्याद सौ. चंदा राजेश उपाध्ये यांनी दाखल केली होती. या अर्जावर सुनावणी होवून पतसंस्था विरोधात केलेली तक्रार निकाली निघाली असून न्यायालयाने पतसंस्थेची बाजू ग्राह्य धरली आहे.

याबाबतची अधिक माहिती अशी की, सौ. चंदा उपाध्ये यांनी महेश नागरी सहकारी पतसंस्था मर्या. यांच्याविरूध्द व त्यांच्या संचालकांविरूध्द फसवणूकीचा दावा दाखल केला होता. सदर अर्जामध्ये चंदा उपाध्ये यांनी असे सांगितले होते की, त्या एका नामांकित इंग्रजी माध्यमाच्या शाळेमध्ये शिक्षिका असून त्यांचे पती व्यवसायाने बिल्डर आहे. त्यांच्या पतींनी सन २००० साली पतसंस्थेकडून कर्ज घेतलेले होते व दरम्यान थोडे कर्ज देखील थकीत झाले व मुदत देखील संपलेली होती. सदर कर्ज जुने नवे करावे लागेल व त्यासाठी जामिनदाराच्या सह्या घ्याव्या लागतील असे सांगितल्यामुळे फिर्यादीच्या पतीच्या व फिर्यादीच्या कोरे फॉर्म, व्हाऊचर, स्टॅम्प इ. सह्या घेतल्या व तिच्याकडून चार ते पाच कोरे चेक घेतले. फिर्यादी हिस कोणतीही रक्कम मिळालेली नाही व असे असताना तिच्याविरूध्द फौजदारी केस दाखल केलेली होती व तिची फसवणुक केली असे नमुद करत पतसंस्था व त्यांच्या संचालकांविरूध्द गुन्हा दाखल करण्याची मागणी केली होती.

सदरची मागणी न्यायालयाने रद्द केलेली आहे. सदर मुळ आदेशाविरूध्द सौ. चंदा उपाध्ये यांनी नगर येथील जिल्हा न्यायालयात क्रिमिनल रिव्हीजन अर्ज १४३/२०२३ चा दाखल केलेला होता. सदर अर्जामध्ये देखील महेश नागरी सहकारी पतसंस्था व त्यांच्या संचालकांना पक्षकार केलेले होते व त्यामध्ये देखील पतसंस्था व त्यांच्या संचालकांविरूध्द गुन्हा दाखल करण्याबाबत विनंती केली होती.

सदर प्रकरणात गुणदोषावर चौकशी करून चंदा राजेश उपाध्ये यांच्या रिव्हिजन जिल्हा न्यायालयाने रद्द केलेले आहे व पतसंस्थेच्यावतीने मांडलेली बाजू ग्राह्य धरलेली आहे. या प्रकरणात महेश नागरी पतसंस्था मर्या. यांच्यातर्फे ॲड. सुभाष जगन्नाथ काकडे, ॲड. सौरभ सुभाष काकडे यांनी कामकाज पाहिले.


अखिल भारतीय पद्मशाली संघम हैदराबाद संलग्न, महाराष्ट्र राज्य पद्मशाली संघमची महाबैठक २३ मार्च रोजी सोलापूर येथे आयोजित करण्यात आली होती. यामध्ये अहिल्यानगर पद्मशाली वधुवर मिलन ग्रुपचे संस्थापक नानाभाऊ मादास यांची सामाजिक व वैवाहिक विभाग उपाध्यक्षपदी नियुक्ती करण्यात आली. यावेळी पद्मशाली समाजचे आमदार देवेंद्र आण्णा कोठे, महाराष्ट्र राज्य पद्मशाली संघमचे अध्यक्ष भुपती कमटम, प्रधान सचिव यशवंत इंदापुरे, एसबीसीचे अशोक इंदापूरे, अखिल भारतीय युवा अध्यक्ष विश्वनाथ संगा, विदर्भ पद्मशाली संघम अध्यक्ष संजय बोमावार, नागपूर जिल्हा अध्यक्ष राजुभाऊ नागुलवार, ज्ञानेश्वर बोड्डु, सचिव गणेश शेरला, बद्रीनाथ जन्नु, महेश काडगी व नरसिंग नराल आदी उपस्थित होते.

# मायंबा येथे २९ मार्चला विशाल भंडारा



नगर – नवनाथ सांप्रदायातील मच्छिंद्रनाथांची संजीवनी समाधी सावरगाव येथे गर्भगिरी डोंगरावर मायंबा येथे असुन ती सुमारे ७०० वर्षापुर्वी घेतली आहे. येथील गुढीपाडवा उत्सवात नगर मधील जुना बाजारमध्ये असलेल्या पुरातन श्री नाथ महाराज समाधी मंदिर तसेच श्री सद्‌गुरू शंकर महाराज मठ च्या वतीने २९ मार्चला विशाल भंडाराचे आयोजन करण्यात आले आहे

नुकतेच या समाधी मंदिराचा जीर्णोद्धारचा शुभारंभ मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या हस्ते करण्यात आला आहे. त्याचा नूतन मंदिर आराखडाचे संकल्प चित्र जाहीर करण्यात आले आहे. येथे गुढीपाडवाच्या आदल्या दिवशी २९ मार्च रोजी सकाळी ६ वाजेपासून कावडी घेऊन येणाऱ्या नाथभक्तांसाठी व भाविकांसाठी महाप्रसाद कार्यक्रमाचे आयोजन संतोषनाथजी महाराज यांच्या मार्गदर्शनाखाली करण्यात आले आहे.

या दिवशी नाथांच्या समाधीवर कावडीच्या गंगाजलाने जलाभिषेक करण्यात येतो व गुढीपाडव्याच्या पहाटे पर्यंत बडे बाबांच्या समाधीला चंदनाचा सुगंधी लेप लावण्यात येतो व सुर्योदयापुर्वी नाथांची समाधी झाकली जाते. वर्षातुन फक्त एकदाच नाथांची समाधी उघडली जाते त्यामुळे लाखो नाथभक्त या महापूजेला उपस्थित राहतात.

सर्व भाविकांनी महाप्रसादाचा लाभ घ्यावा, असे श्री नाथ महाराज समाधी मंदिर तसेच श्री सद्‌गुरु शंकर महाराज मठ भक्त मंडळा कडुन करण्यात आले आहे.

# प्रस्तावित शासकीय वैद्यकीय महाविद्यालय देहरे येथे उभारा

### ग्रामस्थांची खा.निलेश लंके यांच्याकडे निवेदनाद्वारे मागणी

नगर – अहिल्यानगर जिल्ह्यात प्रस्तावित शासकीय वैद्यकीय महाविद्यालयासाठी नगर तालुक्यातील देहरे येथील महाराष्ट्र शासनाच्या मालकीच्या ८.७४ हेक्टर क्षेत्राचा विचार व्हावा असे निवेदन राष्ट्रवादी युवक काँग्रेसचे नगर तालुका उपाध्यक्ष महेश काळे व सुरज धनवटे यांनी नवी दिल्ली येथे खासदार निलेश लंके यांना दिले आहे.

खा. निलेश लंके यांनी संसदेत अहिल्यानगर जिल्ह्यात शासकीय वैद्यकीय महाविद्यालय नसल्याबाबत लक्ष वेधले होते. खा. लंके यांच्या या पाठपुराव्याला यश आले असून महाविद्यालयासाठी जागा निश्चित करण्यासाठी समिती गठीत करण्यात आली आहे.


प्रस्तावित शासकीय वैद्यकीय महाविद्यालय देहरे येथे उभारावे या मागणीचे निवेदन खा.निलेश लंके यांना देताना राष्ट्रवादी युवक काँग्रेसचे नगर तालुका उपाध्यक्ष महेश काळे व सुरज धनवटे.

या संदर्भात सदर मंजूर महाविद्यालयासाठी पंचायत समितीचे माजी सदस्य व्हि.डी काळे पाटील, पंचायत समितीचे माजी सदस्य अरुण लांडगे पाटील, निलेश लंके प्रतिष्ठान देहरेचे अध्यक्ष डॉ. अनिल लांडगे, आजी–माजी सैनिक संघटनेचे अध्यक्ष सुनील बालवे मेजर व निलेश लंके प्रतिष्ठानचे सर्व पदाधिकारी यांच्या मार्गदर्शनाखाली देहरे येथील महाराष्ट्र शासनाच्या गट नंबर ३०० मधील ८.७४ हेक्टर क्षेत्राचा विचार व्हावा असे निवेदन राष्ट्रवादी युवक काँग्रेसचे नगर तालुका उपाध्यक्ष महेश काळे व सुरज धनवटे यांनी नवी दिल्ली येथे खासदार लंके यांना दिले आहे.

या निवेदनात काळे यांनी म्हणले आहे की, सदर ८.७४ हेक्टर क्षेत्र हे शैक्षणिक संस्थासाठी वाटप असून, हे क्षेत्र आहील्यानगर– मनमाड या राष्ट्रीय महामार्गा लगत येत असून, दळणवळणाच्या ददृष्टीने देहरे हे गाव जिल्हयाच्या मध्यावर आणि शहरापासून हाकेच्या अंतरावर आहे. सदर शसकीय जागेचा विचार झाल्यास देहरे व परिसरातील विळद, पिंपरी शिंगवे नांदगाव या गावांचा विकास अधिक जोमाने होण्यास हातभार लागेल, तसेच नगर मधील एमआयडीसी, आणि नवीन मंजूर झालेली एमआयडीसी दोन्ही पण जवळ आहेत,त्यामुळे खा. निलेश लंके यांनी त्रि–सदस्य समितीला या जागेची पाहणी करण्यासाठी व विचार करण्यासाठी शिफारस करावी असे म्हंटले आहे.




नेहरु युवा केंद्र अहिल्यानगर व उडान फाउंडेशनच्यावतीने शहरातील श्रीकांत पेमराज गुगळे कनिष्ठ महाविद्यालयात शहीद दिन साजरा करण्यात आला.

# देशाच्या स्वातंत्र्यासाठी बलिदान देणाऱ्यांची नव्या पिढीला आठवण करून देण्याची गरज

### प्रा. संजय पडोळे यांचे प्रतिपादन; महाविद्यालयीन युवक–युवतींनी शूरवीरांचे स्मरण करुन केला शहीद दिन साजरा, नेहरु युवा केंद्र व उडान फाउंडेशनचा उपक्रम

नगर – शूरवीरांचे स्मरण दिवस म्हणून शहीद दिन साजरा केला जातो. देशाच्या स्वातंत्र्यासाठी लढणाऱ्या क्रांतिकारकांच्या बलिदानाचा सन्मान करण्यासाठी या दिवसाचे खास स्मरण देशभरात केले जाते. ब्रिटिश राजवटी पासून मुक्त होण्यासाठी त्यांच्या अथक संघर्षाची आणि बलिदानाची ही एक मार्मिक आठवण आहे. नव्या पिढीला देशसेवेची प्रेरणा देण्यासाठी देशाच्या स्वातंत्र्य संग्रामात बलिदान देणाऱ्यांची आठवण करून देण्याची गरज निर्माण झाली असल्याचे प्रतिपादन माजी प्राचार्य संजय पडोळे यांनी केले.

नेहरु युवा केंद्र अहिल्यानगर व उडान फाउंडेशनच्यावतीने शहरातील श्रीकांत पेमराज गुगळे कनिष्ठ महाविद्यालयात शहीद दिन साजरा करण्यात आला. यावेळी पडोळे बोलत होते. याप्रसंगी संतोष लयचेट्टी, माहेरच्या अध्यक्षा रजनीताई ताठे, प्राचार्य दत्तात्रय कसबे, प्रा. सुभाष चिंधे, प्रा. संजय शेवाळे, सहशिक्षिका विजया संसारे, कल्पना तुपे, सुवर्णा बारगळ, अश्विनी घोडके, पुनम साठे, पल्लवी चोरडिया, सहशिक्षक गणेश पुंड, ज्ञानेश्वर बर्डे, किशोर सप्रे, ऋषिकेश माताडे, प्रमोद कानडे, प्रवीण पाटील, विद्या बाबद, उडानच्या अध्यक्षा आरती शिंदे आदींसह महाविद्यालयीन युवक–युवती उपस्थित होते.

प्राचार्य दत्तात्रय कसबे म्हणाले की, शहीद दिन हा आपल्या राष्ट्राच्या वृद्धीसाठी सक्रियपणे योगदान देण्यास प्रेरित करतो. राष्ट्रीय एकता आणि अभिमानाचे प्रतीक म्हणून शहीद दिन साजरा केला पाहिजे. देशाच्या स्मृतीला बळकटी देणारा हा दिवस महत्त्वाचा आहे. थोर स्वातंत्र्य सेनानी लाला लजपतराय यांनी निषेध मोर्चा काढला होता. या मोर्चामधील जमाव पांगवण्यासाठी अमानुष लाठी चार्ज करण्यात आला. त्यात लाला लजपतराय जखमी होऊन त्यांचा मृत्यू झाला. भारावलेल्या क्रांतिकारकांना हे सहन झाले नाही, त्यांच्या मृत्यूला कारणीभूत असणाऱ्या इंग्रज अधिकाऱ्याला ठार मारण्याचा भगतसिंह, राजगुरू आणि सुखदेव यांनी ठरविले व त्या योजनेनुसार ब्रिटिश पोलीस अधिकारी जॉन पी. सॅण्डर्सची हत्या केली. या तिघांना २३ मार्च १९३१ रोजी लाहोरच्या तुरुंगात फाशी देण्यात आली. या तिन्ही तरुण युवा देशभक्तांच्या फाशीनंतर तमाम भारतीयांचे रक्त पेटून उठले. त्यांच्या बलिदानानंतर स्वातंत्र्याची चळवळ अधिक प्रखर झाली.

संतोष लयचेट्टी यांनी आजचा युवक मोबाईलच्या जाळ्यात गुरफटत चालला आहे. नैराश्य, व्यसनाधिनतेकडे वळत आहे. अशा युवा अवस्थेत काय करता येऊ शकते? याचे आदर्श उदाहरण भगतसिंग, राजगुरू, सुखदेव हे युवक आहे. निश्चित देशभक्ती देशासाठी सर्वस्वी त्यागाची तयारी अशा प्रकारे देश प्रेमाचे धडे युवकांनी गिरवले पाहिजे, असे त्यांनी सांगितले.

आरती शिंदे यांनी नेहरु युवा केंद्राचे कार्य युवकांसाठीचे विविध उपक्रम, शासकीय योजना याबाबत माहिती दिली. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन सहशिक्षिका उमादेवी राऊत यांनी केले. सुभाष चिंधे यांनी आभार मानले. कार्यक्रमासाठी नेहरु युवा केंद्राचे जिल्हा समन्वय अधिकारी संकल्प शुक्ला, कार्यक्रमाधिकारी सिद्धार्थ चव्हाण, रमेश गाडगे, जय युवा ॲकॅडमीचे अध्यक्ष ॲड. महेश शिंदे यांचे मार्गदर्शन लाभले.

# साहित्यिक विश्वास पाटील यांची भातोडी येथील युध्दभूमीला भेट

### शरीफजी राजे भोसले यांच्या समाधीचे घेतले दर्शन; ग्रामस्थांच्यावतीने सत्कार

नगर – महाराष्ट्राच्या इतिहासात महत्त्वाची लढाई ठरलेली व मराठ्यांच्या शौर्याची प्रचेती देणाऱ्या भातोडीच्या (ता. नगर) युध्दभूमीला ज्येष्ठ साहित्यिक विश्वास पाटील यांनी भेट दिली. तर शरीफजी राजे भोसले यांच्या समाधी स्थळाचे दर्शन घेतले. यावेळी भातोडी ग्रामस्थांच्यावतीने त्यांचे स्वागत करण्यात आले. याप्रसंगी साहित्यिक ज्ञानदेव पांडुळे, आदिनाथ शिंदे, सरपंच विक्रम गायकवाड, सुभाष कचरे, जालिंदर लबडे, बाबासाहेब काळे, दिनेश आवटी आदी उपस्थित होते.


साहित्यिक विश्वास पाटील यांनी भातोडी येथील तलावाची पहाणी करुन येथील शहाजीराजे व शरीफजी राजे भोसले यांच्या इतिहासाची माहिती घेतली.

साहित्यिक विश्वास पाटील यांनी भातोडी येथील तलावाची पहाणी करुन येथील शहाजीराजे व शरीफजी राजे भोसले यांच्या इतिहासाची प्रत्यक्ष माहिती घेतली. यावेळी ग्रामस्थांची संवाद साधताना ऐतिहासिक गौरवशाली लढाई बद्दल सांगताना पाटील म्हणाले की, हिंदुस्तानच्या इतिहासात प्रथमच औरंगजेब सेनेचा पराभव शहाजी आणि शरीफजी या बंधूंनी केला. औरंगजेबच्या बलाढ्य सेनेला पराभूत करताना कमी सैन्य दलाने गनिमी काव्याने युक्तीचा वापर करून युद्धात धूळ चारली. पण या युद्धात शरीफजी राजे यांना वीरमरण प्राप्त झाले. त्यांच्या समाधी स्थळाची अवस्था पाहून खंत व्यक्त केली. तर ग्रामस्थांच्या सहकार्याने आपण यामध्ये घडवून सरकारी दरबारी त्याचा पाठपुरावा करण्याचे आश्वासन दिले.

# ‘आनंदऋषीजी हॉस्पिटल’मधील डायलेसिस विभाग जिल्ह्यासह मराठवाड्यातील सर्वात मोठे व अद्ययावत

### महावीर बडजाते यांचे प्रतिपादन; १५० रुग्णांची किडनी विकार तपासणी



राष्ट्रसंत आचार्य श्री आनंदऋषीजी महाराज यांच्या ३३ व्या स्मृतिदिनानिमित्त आनंदऋषीजी हॉस्पिटलमध्ये मोफत किडनी विकार तपासणी शिबिर आयोजित करण्यात आले होते.

नगर – गोर–गरीबांच्या आरोग्य सेवेतून आनंदऋषीजी हॉस्पिटलचे नाव राज्यभर पसरले आहे. हॉस्पिटलचे डायलेसिस विभाग हे जिल्ह्यासह मराठवाड्यातील सर्वात मोठे व अद्यावत विभाग म्हणून नावरुपास आले आहे. महिन्याला हजारो डायलेसिस रुग्णांना निशुल्क सेवा देण्याचे काम केले जात आहे. कृतार्थ व सेवाभावाने आरोग्य सेवेचे कार्य सुरु असून, सर्वसामान्यांना अद्यावत आरोग्याच्या सुविधा मिळत आहे. या सेवाकार्यात योगदान देताना समाधान मिळत असल्याचे प्रतिपादन महावीर बडजाते यांनी केले.

राष्ट्रसंत आचार्य श्री आनंदऋषीजी महाराज यांच्या ३३ व्या स्मृतिदिनानिमित्त जैन सोशल फेडरेशन संचालित आनंदऋषीजी हॉस्पिटलमध्ये मोफत किडनी विकार तपासणी शिबिराच्या उद्घाटनाप्रसंगी महावीर बडजाते बोलत होते. याप्रसंगी अशोक चुडीवाल, अक्षर बडजाते, डॉ. प्रकाश कांकरिया, मानकचंद कटारिया, अनिल मेहेर, डॉ. आशिष भंडारी, तज्ञ डॉ. गोविंद कासट, डॉ. प्राजक्ता पारधे आदी उपस्थित होते.

प्रास्ताविकात डॉ. प्रकाश कांकरिया म्हणाले की, आरोग्य सेवेचे लावलेले रोपटे वटवृक्षाप्रमाणे बहरले आहे. या वटवृक्षाच्या छायेत अनेक गरजूंना आधार मिळत आहे. संपूर्ण महाराष्ट्रातून या हॉस्पिटलमध्ये रुग्ण येत असून, एका छताखाली सर्व प्रकारची आरोग्य सेवा दिली जात आहे. कत्तल खाण्याचे आरक्षण असलेल्या या जागेचे परिवर्तन होऊन जीवन देणारे आरोग्य मंदिर बनले. आनंदऋषीजी हॉस्पिटलमध्ये मोठ्या शहराच्या धर्तीवर आरोग्य सेवा दिली जात आहे. तसेच भावी पिढीच्या भवितव्यासाठी भगवान महावीर युनिव्हर्सिटीचे शैक्षणिक प्रकल्प वेगाने उभे राहत असल्याची माहिती त्यांनी दिली.

डॉ. गोविंद कासट म्हणाले की, जिल्ह्यातील सर्वात मोठे व अद्यावत तंत्रज्ञानाने युक्त असलेले आनंदऋषीजी हॉस्पिटलचे डायलेसिस विभाग आहे. डायलेसिससाठी वापरले जाणारे आरओ वॉटर, उच्च दर्जाचे मशीन व अद्यावत तंत्रज्ञान रुग्णांना जीवनदायी ठरत आहे. दर महिन्याला दोन हजार पेक्षा अधिक व वर्षाला २७ हजार डायलेसिस सुरु आहे. मागील ५ वर्षात सव्वा लाखाच्या पुढे रुग्णांचे आयुष्यमान भारत अंतर्गत मोफत डायलेसिस करण्यात आले आहे. कावीळ झालेल्या रुग्णांच्या डायलेसिससाठी वेगळे मशीन उपलब्ध असून, तब्बल ३२ जर्मन कंपनीचे मशीन व अद्यावत फिल्टरींग युनिटच्या माध्यमातून सेवा दिली जात असल्याची माहिती त्यांनी दिली.

शिबिरात १५० रुग्णांची मोफत किडनी विकार संबंधी विविध तपासण्या करण्यात आल्या. या शिबिरासाठी जिल्ह्यासह महाराष्ट्राच्या विविध भागातून रुग्ण आले होते. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन डॉ. आशिष भंडारी यांनी केले. आभार अनिल मेहेर यांनी मानले.

### लवकरच आनंदऋषीजी हॉस्पिटलमध्ये किडनी प्रत्यारोपण सुरु करण्याचा मानस

आनंदऋषीजी हॉस्पिटलमध्ये उच्च दर्जाचे मशीन, अद्यावत तंत्रज्ञान व तज्ञ डॉक्टरांच्या माध्यमातून सेवी दिली जात असताना गरजू रुग्णांची गरज ओळखून लवकरच हॉस्पिटलमध्ये किडनी प्रत्यारोपण सुरु करण्याचा मानस डॉक्टरांसह संचालकांनी व्यक्त केला आहे. यामुळे रुग्णांना मोठ्या शहरात जाण्याची गरज भासणार नसून, या आरोग्य मंदिरात ही सेवा देखील उपलब्ध होणार असल्याची माहिती देण्यात आली.



झुलेलाल मंदिर परिसरातील रस्ता कॉंक्रिटीकरणाच्या शुभारंभ आ. संग्राम जगताप यांच्या हस्ते करण्यात आला.

# नगरसेविका ज्योती गाडे यांच्या सातत्यपूर्ण पाठपुराव्यामुळे तारकपूर परिसरात विकास निधी : आमदार संग्राम जगताप

नगर – आम्ही शासन दरबारी मेहनत घेत मोठे निधी आणत असतो परंतु स्थानिक पातळीवर सुध्दा नगरसेवकांनी सूक्ष्म आणि दुरदृष्टी युक्त नियोजन ठेवत काम केले तर शहराचा अल्पावधीतच कायापालट होतो. नगरसेविका ज्योती गाडे यांनी तारकपूर परिसरात विकास व्हावा, यासाठी गेल्या अनेक दिवसांपासून पाठपुरावा केला आहे; त्यामुळे निधी मिळाला आहे, असे प्रतिपादन आ. संग्राम जगताप यांनी तारकपूर येथील झुलेलाल मंदिर परिसरातील रस्ता कॉंक्रिटीकरणाच्या शुभारंभप्रसंगी केले.

नगरसेविका ज्योती गाडे आणि उद्योजक अमोल गाडे यांचे यावेळी नागरिकांनी आभार मानले. अम ोल गाडे म्हणाले, आम्ही सावेडी उपनगराची पाहणी करून त्याचे तीन भाग तयार करून परिसरानुसार रस्ता, गटार आणि पालिका भुखंडांचे सुशोभीकरण अशी कामांची वर्गवारी केली आहे. यात आता झुलेलाल मंदिर परिसरात रस्ते अत्यंत महत्त्वाचे आहेत त्यामुळे आ. जगताप यांच्या माध्यमातून निधी मंजूर करून घेत दर्जात्मक काम वेळेत पूर्ण करून याचे उद्घाटन सुध्दा करण्यात येईल, असे आश्वासन दिले.

यावेळी ज्येष्ठ नागरिक जनक आहूजा, राजेंद्र कंत्रोड, सुरेश हिरानंदानी, दामोदर बठेजा, राधेश्याम साहनी, जीतू गंभीर, चिंटू गंभीर, किशोर कंत्रोड, कन्हैय्या गोपलानी, जयकुमार रंगलाणी, जितेंद्र सदवाणी, हिरा पंजवानी, कैलास नवलानी, बब्बु नवलानी, विक्की आहुजा, टिंक्कु आहुजा, कुणाल गंभीर, बल्लु सचदेव आदींसह नागरिक उपस्थित होते. नागरिकांनी आ. संग्राम जगताप आणि अमोल गाडे यांचा पुष्पगुच्छ देऊन सत्कार केला आणि कामासाठी आनंद व्यक्त केला.

# गुलमोहर रोड स्वामी समर्थ मंदिरात प्रकट दिनानिमित्त विविध कार्यक्रम



नगर – सावेडी उपनगरात गुलमोहर रोडवरील सावली सोसायटी मधील श्री अक्कलकोट निवासी वटवृक्ष श्री स्वामी समर्थ सेवा संस्था आयोजित मंदिरात ३१ मार्च रोजी श्री स्वामी समर्थ महाराजांचा प्रकट दिन उत्सव साजरा होत असून यानिमित्त विविध धार्मिक कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले अ ाहे.

या धार्मिक कार्यक्रमात २८ ते ३० मार्च पर्यंत सामुदायिक श्री गुरुलीलामृत पारायण सोहळा होणार आहे. दुपारी साडेबारा ते साडेतीन पर्यंत पारायण होणार आहे. या सोहळ्यामध्ये असंख्य महिलांनी सहभाग घेतला असून पारायण सोहळा ऐकण्याचा लाभ भाविकांनी घ्यावा.

३० मार्च रोजी गुढीपाडव्याला पहाटे ५ वाजता अभ्यंग स्नान, सकाळी ८ वाजता आरती, दुपारी १२ वाजता नैवेद्यआरती, सायंकाळी ७ वाजता धुपारती होऊन सायंकाळी साडेसात वाजता अनिरुद्ध धर्माधिकारी ह्यांचा अभंग वर्षा हा भक्ती गीतांचा कार्यक्रम होणार आहे.

३१ मार्च रोजी प्रकट दिनानिमित्त पहाटे ५ वाजता श्रींना रुद्राभिषेक सकाळी ८ वाजता आरती, दुपारी साडेबारा वाजता नैवेद्यआरती दुपारी १ ते ३ महाप्रसादाचा कार्यक्रम होइल. सायंकाळी ६ वाजता श्री स्वामी समर्थ महाराजांच्या उत्सव मूर्ती व पादुकांची रथ मिरवणूक निघणार आहे. सायंकाळी ९ वाजता आरती, रात्री १० वाजता शेजारती होऊन उत्सवाची सांगता होईल. भाविकांनी उपस्थित रहावे. दर्शनाचा, कार्यक्रमाचा, महाप्रसादाचा लाभ घ्यावा, असे आवाहन सेवा संस्थेच्या वतीने करण्यात आले आहे.

# अहिल्यानगर जिल्हा ॲडव्हर्टायझिंग असोसिएशनच्या अध्यक्षपदी गुलशन अरोरा, उपाध्यक्षपदी जयंत देशपांडे व सचिवपदी सुरेंद्र मुथा



अहिल्यानगर जिल्हा ॲडव्हर्टायझिंग असोसिएशनच्या अध्यक्षपदी गुलशन अरोरा, उपाध्यक्षपदी जयंत देशपांडे व सचिवपदी सुरेंद्र मुथा यांची बिनविरोध निवड झाल्याबद्दल सत्कार करण्यात आला.

नगर – अहिल्यानगर जिल्हा ॲडव्हर्टायझिंग असोसिएशनच्या अध्यक्षपदी ॲड मॅजिक ॲडव्हर्टायझिंगचे गुलशन अरोरा, उपाध्यक्षपदी क्रिएटिव्ह कम्युनिकेशनचे जयंत देशपांडे व सचिवपदी आशा पब्लिसिटीचे सुरेंद्र मुथा यांची बिनविरोध निवड करण्यात आली.

मावळते अध्यक्ष नितीन देशमुख यांच्या अध्यक्षतेखाली झालेल्या असोसिएशनच्या सभेत अध्यक्षपदासाठी गुलशन अरोरा यांच्या नावाची सूचना राजेंद्र म्याना यांनी मांडली, त्यास प्रसाद मांढरे यांनी अनुमोदन दिले, तर सचिवपदासाठी सुरेंद्र मुथा यांच्या नावाची सूचना प्रमोद गांधी यांनी मांडली, त्यास किशोर मरकड यांनी अनुमोदन दिले.

निवडीनंतर अध्यक्ष गुलशन अरोरा यांनी समायोचित, व्यावसायिक तथा सामाजिक उपक्रम राबविण्याचा मानस व्यक्त करून वृत्तपत्रे व ॲडव्हर्टायझिंग एजन्सीमधील संवाद वाढविण्याला प्राधान्य दिले जाईल, असे सांगितले.

सचिव सुरेंद्र मुथा यांनी संघटनेला अधिक बळकट करणार असल्याचे सांगितले. याप्रसंगी सदस्यांनी नूतन कार्यकारिणीचा सत्कार केला.

असोसिएशनचे कार्यकारिणी सदस्य – नितीन देशमुख (सुदर्शन ॲडव्हर्टायझिंग), प्रफुल्ल मुथा (अभी पब्लिसिटी), प्रमोद गांधी (पिटू पब्लिसिटी), प्रसाद मांढरे (कालिका ॲडव्हर्टायझिंग), किशोर मरकड (चैतन्य पब्लिसिटी), मनोज गुगळे (क्लासिक पब्लिसिटी), राजेंद्र म्याना (गॅलेक्सी ॲडव्हर्टायझिंग), संतोष बाफना (निर्मल ॲडस्), अशोक कानडे (सत्यम ॲडस्), सतीश वैजापूरकर (वैजापूरकर ॲडस्, शिर्डी), ललित कोठारी (कोठारी ॲडस, श्रीरामपूर), अनिल पांडे (पांडे पब्लिसिटी, श्रीरामपूर).

# ‘आरोग्य भारती’तर्फे आयोजित शिबिरात ३५८ वारकऱ्यांची तपासणी, मोफत औषधे



आरोग्य भारतीने नाथ षष्ठीचे औचित्य साधून श्रीक्षेत्र पैठण आयोजित केलेल्या आरोग्य शिबिरात सुमारे ३५८ वारकऱ्यांची तपासणी करून मोफत औषधी देण्यात आल

नगर – आरोग्य भारतीने नाथषष्ठीचे औचित्य साधून श्रीक्षेत्र पैठण आयोजित केलेल्या आरोग्य शिबिरात सुमारे ३५८ वारकऱ्यांची तपासणी करून मोफत औषधी देण्यात आली. आरोग्य भारतीच्या या आरोग्य सेवेने वारकरी भारावून गेले.

या शिबिरात अहिल्यानगर, पुणे आणि छत्रपती संभाजीनगर या तीन जिल्ह्यातील आरोग्य भारतीचे पदाधिकारी व सभासद सहभागी झाले होते. या सर्वांनी वारकऱ्यांची आरोग्य तपासणी करून औषध मोफत दिली.

शिबिराच्या उद्घाटनप्रसंगी आरोग्य भारती पश्चिम महाराष्ट्रचे सचिव डॉ संतोष गटणे, प्रांत सहसचिव डॉ. किशोर पुरकर, डॉ.अप्पा कुलकर्णी, गुजर महाराज, कल्याण काळे हे उपस्थित होते.

उद्घाटन सोहळ्यात डॉ.किशोर पुरकर यांनी आरोग्य भारतीच्या कार्याची माहिती दिली. स्वस्थ जीवनशैली, योग सूर्यनमस्कार, व्यायाम याचे दैनंदिन जीवनातील महत्व सांगितले. शिबिराचे हे २५ वे वर्ष आहे. या शिबिरात आलेल्यांची तपासणी केली असता संधीवात, त्वचाविकार, दमा, सर्दी, खोकला या आजाराचे प्रमाण जास्त होते.

डॉ.हेडगेवार रुग्णालयातर्फे डॉ.राजेंद्र दांडगे, डॉ.सोळुंके, डॉ. रिना निकाळजे यांनी नेत्र तपासणी केली. १४० जणांनी डोळ्यांची तपासणी करून घेतली. त्यात १२ मोतीबिंदू रुग्ण आढळले. त्यांना शस्त्रक्रियेसाठी छत्रपती संभाजीनगरला डॉ.हेडगेवार रुग्णालयात पाठवण्यात आले. तसेच मधुमेही रुग्णांसाठी न्यूरोपॅथी तपासणीची व्यवस्था सिस्टॉपिक कंपनीचे मॅनेजर श्री. परदेशी यांनी केली. याचा फायदा बऱ्याच वारकऱ्यांना झाला. शेवटी डॉ.किशोर पुरकर यांचे प्रवचन झाले. त्यात त्यांनी आपला समाज आणि आपला देश समृद्ध व्हावा यासाठी सर्वांनी एकदिलाने प्रयत्न करण्याची आवश्यकता प्रतिपादन केली.

शिबिराच्या समारोप प्रसंगी श्री. गुजर महाराजांनी आरोग्य भारतीच्या सर्व सभासदांचे आभार मानून सत्कार करत वारकरी बंधू–भगिनींच्या आरोग्य सेवेची प्रशंसा केली.

या शिबिराच्या यशस्वीतेसाठी आरोग्य भारतीच्या प्रांत कार्यकारिणीचे सदस्य श्रीपाद शिंदीकर, सचिव कैलास चोथे, प्रांत कार्यकारिणी सदस्य दीपक अष्टपुत्रे, डॉ. मिहीर कामत, श्री. लिमये, श्री. बेलापुरकर, प्रसाद चिल्का, श्री. हांडे, अण्णा पठाडे यांनी सहकार्य केले.



रसाळ नेत्रालयाच्या सहाव्या वर्धापन दिनानिमित्त शिबिराचे उद्घाटन दीपप्रज्वलनाने करताना शीतलताई जगताप, डॉ. प्रकाश रसाळ, अमृता रसाळ, रसिकलाल गुगळे दाम्पत्य.

## जाहीर नोटीस

तमाम लोकांस कळविण्यात येते की, खालील परिशिष्टात नमुद केलेल्या मिळकतीचे विद्यमान मालक एम.एम.कन्स्ट्रक्शनचे भागीदार म्हणुन, (डिव्हीजन मे. मोतीलाल माणकचंद) श्री.किशोर हस्तीमल मुनोत यांचे मालकी व वहिवाटीची आहे, त्यांनी सदरील प्लॉटस् मिळकती भागीदारी संस्थेचे वतीने आज रोजी केलेले निर्वेध व निजोखमी असल्याचा भरवसा देवून ती आमचे अशिलास खरेदी देण्याचे मान्य व कबुल आहे. आमचे अशिल हा खरेदी व्यवहार लवकरच पुर्ण करण्याचे विचारात आहेत. तत्पुर्वी या मिळकतीची विद्यमान मालकांची मालकी व मिळकत निर्वेध व निजोखमी असल्याबाबतची खातरजमा करून घेण्याच्या उद्देशाने ही जाहीर नोटीस प्रसिद्ध केलेली आहे. सबब ज्या कोणाचेही कसलेही कायदेशीर अधिकार, हक्क, अथवा हितसंबंध या मिळकतीत असतील अशाने ही जाहीर नोटीस प्रसिद्ध झाले दिवसांपासुन ७ दिवसांचे आत त्याचे या मिळकतीशी असणाऱ्या हितसंबंधाबाबतच्या कागदोपत्री पुराव्यांनीशी खाली सही करणाऱ्यांकडे समक्ष भेटून त्याची खातरजमा करून घ्यावी. व या व्यवहारांस लेखी हरकत घ्यावी. या मुदतीत जर कोणाचीही हरकत आली नाही तर ही मिळकत निर्वेध व निजोखमी असल्याचे ग्राह्य धरून आमचे अशिल त्याचा खरेदी व्यवहार पुर्ण करेल व मग कोणाचीही हरकत ग्राह्य धरली जाणार नाही यांची नोंद घ्यावी.

- **परिशिष्ट- मिळकतीचे वर्णन** :- मौजे नागापुर, ता. व जि. अहिल्यानगर (जुना अहमदनगर) येथील अहिल्यानगर (जुना अहमदनगर) महानगरपालिका हद्दीतील खालील तपशीलाचे बिगरशेती व मंजुर ले आऊटमधील मोकळे प्लॉटस् :-

| स.नं. | प्लॉट नं. | एकुण क्षेत्रफळ |
|---|---|---|
| ५/२ | २ | १२.९१.५० आर/चौ.मी. (१२९१.५० चौ.मी.) |
| (जुना स.नं. १४९/२). | ३ | १२.९१.५० आर/चौ.मी. (१२९१.५० चौ.मी.) |
| | ४ | १६.२८.०८ आर/चौ.मी. (१६२८.०८ चौ.मी.) |

एकुण क्षेत्रफळ ४२.११.०८ आर/चौ.मी. (४२११.०८ चौ.मी.)

हे संपुर्ण क्षेत्राचे मोकळे प्लॉटस् आमचे अशिलांस खरेदी देणेचे ठरले आहे.

**यांसी चतुःसिमा :-**

| प्लॉट नंबर | पुर्वेस | दक्षिणेस | पश्चिमेस | उत्तरेस |
|---|---|---|---|---|
| २ | ओपन स्पेस | प्लॉट नं. ३ | १२ मी. रुंदीचा रस्ता व पुढे नगर मनमाड रस्ता. | प्लॉट नं. १ व ॲमिनिटी. |
| ३ | ओपन स्पेस | प्लॉट नं. ४ | १२ मी. रुंदीचा रस्ता व पुढे नगर मनमाड रस्ता. | प्लॉट नं. २ |
| ४ | ओपन स्पेस व (जुना) सर्व्हे नं. १४६ पै. | गटार लेन व खुली जागा. | १२ मी. रुंदीचा रस्ता व पुढे नगर मनमाड रस्ता. | प्लॉट नं. ३ |

येणेप्रमाणे चतुःसिमापुर्वकच्या प्लॉटस् मिळकती. नोटीस दिली. ता. २६.०३.२०२५.

**ॲड. निहाल अहमद बाबुलाल बागवान**
श्रेयस लॉनच्या मागे, सैनिक कॉर्नर,
तपोवन रोड, भिस्तबाग, अहमदनगर मो. ९९२१३५५७७८

**ॲड. विजय प्रल्हाद अत्रे,**
‘पूर्णश्री’, प्लॉट नं. २८, स्वामी गजानन नगर, कजबे मळा,
भिस्तबाग, अहमदनगर. मो. ९८२२०४३९६७.

## जाहीर नोटीस

**तमाम लोकांस या जाहीर नोटीसीने कळविण्यात येते की, डि. अहमदनगर सब डि. ता. नगर पैकी अहमदनगर महानगरपालिका हद्दीतील मौजे चाहुराणा बुद्रुक टी. पी. स्किम नं. ३ मधील फायनल प्लॉट नं. १०७ चे क्षेत्र १९२२.०० चौ. मी. यावर बांधण्यात आलेल्या कल्पना पॅलेस या बहुमजली इमारतीमधील पहिल्या मजल्यावरील सदनिका क्र. १०६ याचे एकूण बांधकाम क्षेत्र ५५.७४ चौ. मी. ही संपूर्ण मिळकत यासी चतुः सिमा पुर्वेस – सदनिका १०४, पश्चिमेस – ओपन टु स्काय, दक्षिणेस – जीना व कॉमन पॅसेज, उत्तरेस – ओपन टू स्काय ही मिळकत. ही संपूर्ण फ्लॅट मिळकत त्यातील तदंगभूत वस्तुसह, जाणे येणेचे हक्कासह, तसेच वागणुकीचे वहिवाटीचे हक्कासह काहीही एक राखुन न ठेवता, सदर मिळकत गोरक्षनाथ चंद्रकांत सोनवणे व सौ. रेणुका गोरक्षनाथ सोनवणे, दोघेही रा. कल्पना पॅलेस, गणेशवाडी, स्वस्तीक चौक, अहमदनगर यांचे स्वकष्टार्जित खरेदी मालकी वहिवाटीची आहे. विद्यमान मालकांनी सदर मिळकत आमचे अशिलांना कायमखुश खरेदी देण्याबाबत बोलणी करुन सौदा केलेला आहे व संपूर्ण रक्कम स्विकारुन आमचे अशिलाचे लाभात रजिस्टर्ड साठेखताचा दस्त लिहून नोंदवुन दिलेला आहे. सदर मिळकत निर्वेध, निजोखमी असून त्यांचे प्रत्यक्ष कब्जात असल्याबद्दलची खात्री व भरवसा विद्यमान मालकांनी दिलेला आहे. तरी या जाहीर नोटीसीने कळविण्यात येते की, यदाकदाचित सदर मिळकतीवर कोणाचाही कोणताही गहाण, दान, बक्षिस, बोजा, कब्जा, हक्क, हितसंबंध जप्ती, पोटगीबोजा, हिस्सा, मनाई हुकूम, दावा, इजमेंटरी राईट इत्यादी अगर इतर काहीही हक्क असल्यास अगर कोणाचा कोणताही क्लेम असल्यास सदरची नोटीस प्रसिद्ध झाल्यापासुन १० दिवसांचे आत समक्ष कागदपत्रांनिशी खात्री करुन द्यावी अन्यथा सदर मिळकत निर्वेध, निजोखमी समजून ठरल्याप्रमाणे आमचे अशिल खरेदीचा व्यवहार पूर्ण करतील तदनंतर कोणाचीही कोणतीही हरकत चालणार नाही याची नोंद घ्यावी. ही जाहीर नोटीस दिली.**

दिनांक – २६/०३/२०२५
अहमदनगर

**ॲड. अतुल गुगळे**
२४५२/५३, तेलीखुंट, अहमदनगर
मो. नं. ९८२२३४५९७२

## जाहीर नोटीस

या जाहीर नोटीसीने तमाम लोकांस कळविणेत येते की, खालील परिशिष्टात नमुद केलेला प्लॉट मिळकतीचे विद्यमान मालक **मोहम्मद नवेद मोहम्मद खालिद शेख, रा. स. नं. ९२/२, प्लॉट नं. २९, राजनगर, नागरदेवळे, अहमदनगर** यांचे मालकी वहिवाटीचा आहे. सदर प्लॉट मिळकतीचे विक्री करण्याचा करार करुन आमचे अशिलांबरोबर कायमखुष खरेदी देण्यांचे ठरविले आहे. तसेच सदरची मिळकत निर्वेध, निजोखमी असल्या बाबत आमचे अशिलास विश्वास व भरोसा दिलेला आहे.

परंतु कोणाचीही तक्रार राहु नये म्हणून या जाहीर नोटीसीने कळविण्यात येते की सदर मिळकतीबाबत कोणतेही चालु वाद असल्यास अथवा साठेखत, खरेदीखत, गहाणखत, दान, वारस हक्क, बक्षिसपत्र मनाई हुकुम, दावा कोर्ट कारवाई बँक बोजा सोसायटी राईटस अन्य वस्त्र लिन अथवा अगर कोणताही कसल्याही प्रकारचा हक्क, हितसंबंध असल्यास संबंधीताने ही नोटीस प्रसिध्द झाले पासुन **७ दिवसांचे** आत खालील दिलेल्या पत्यावर संपुर्ण कागदोपत्री पुराव्यानिशी लेखी कळवावे, जर मुदतीत कोणाचेही कोणतेही हरकत न आल्यास आमचे अशिल सदर प्लॉट खरेदी विक्रीचा व्यवहार पूर्ण करतील मग कोणाचेही कोणत्याही प्रकारे अगर हरकत चालणार नाही, असल्यास त्यांनी जाणीवपूर्वक सोडुन दिले आहे असे समजण्यात येईल.

**परिशिष्ट**

**मिळकतीचे वर्णन** – डि।। अहमदनगर सब डि।। ता. नगर पैकी अहमदनगर जिल्हा परिषद हद्दीतील मौजे भिंगार येथील सी. आय. व्ही. ऑपरेटीव्ह हाऊसिंग सोसायटी लि. मधील बिगरशेती प्लॉट मिळकतीचे वर्णन खालील प्रमाणे –

| स. नं. | प्लॉट नं. | चौ. मीटर |
|---|---|---|
| ३२५/१/३२५/२अ | ६१ब | १४१.३७ |

हा संपूर्ण प्लॉट मिळकतीबाबत.

**यांसी चतु:सिमा :**
पुर्वेस – ७.६ मी. रुंदीचा रस्ता दक्षिणेस – प्लॉट नं. ६०
पश्चिमेस – प्लॉट नं. ५५ उत्तरेस – प्लॉट नं. ६१ अ

दि. २६/०३/२०२५
अहमदनगर

**ॲड. नाजिम अहमद इस्माईल शेख**
**ॲड. शेख मोहसीन इलियास**
जुन्या कलेक्टर ऑफीस जवळ, डावरेगल्ली, अहमदनगर
मो. ९८८१४३१८६० / ७२७६२५२४७८

## Public Notice

**This public notice is to inform the public that our client Mrs. Kiran Vinod Gehi purchased the said property from M/s Sarswati construction and this is registered document, Document no.6535-2011,PVL-3, dated 28 th June 2011.**

**Mrs. Kiran Vinod Gehi has misplaced the said original document at Ahmadnagar, on 12/07/2024. The said property is owned and occupied by Mrs. Kiran Vinod Gehi. Mrs. Kiran Vinod Gehi has registered the missing complaint at Ahmadnagar, Police Station under Property Missing complaint No.1397/2024 dated 12/07/2024.**

**Types of Document:- Original Agreement for sale**

**Description of property:- Siddhivinayak Solitaire CHS, Flat No. 1103, 11th floor, Plot No. 38, Sec- 36, Kamothe, Dist.-Raigad, Any person who finds the above mentioned documents should contact the address below within 7 days. If no response or objection is received from anyone within the stipulated time, our client will proceed further proceeding.**

**Date: 26/03/2025**

**Adv. Abhijeet Rajesh Kothari**
**"Abhijeet", Munot Estate,**
**Station Road, Ahmednagar 414001.**
**Mob. 9604229999**

## जाहीर नोटीस

ही सार्वजनिक सूचना जनतेला कळवण्यासाठी आहे की आमचे क्लायंट श्रीमती किरण विनोद गेही यांनी ही मालमत्ता मेसर्स सरस्वती कन्स्ट्रक्शन कडून खरेदी केली आहे आणि हे नोंदणीकृत दस्तऐवज आहे, दस्तऐवज क्रमांक ६५३५–२०११, PVL-३, दिनांक २८ जून २०११.

श्रीमती किरण विनोद गेही यांनी सदर मूळ कागदपत्र अहमदनगर येथे दिनांक १२/०७/२०२४ रोजी हरवलेले आहे. सदर मालमत्तेची मालकी श्रीमती किरण विनोद गेही यांच्या मालकीची आहे.

श्रीमती किरण विनोद गेही यांनी मालमत्ता हरवल्याची तक्रार क्रमांक १३९७/२०२४ दिनांक १२/०७/२०२४ अन्वये अहमदनगर पोलीस स्टेशन येथे हरवल्याची तक्रार नोंदवली आहे.

दस्तऐवजाचे प्रकार: विक्रीसाठी मूळ करार

मालमत्तेचे वर्णन:–सिद्धिविनायक सॉलिटेअर सीएचएस, फ्लॅट नं. ११०३, ११ मजला, प्लॉट क्र. ३८, से. – ३६, कामोठे, जि. रायगड,

ज्या व्यक्तीला वरील नमूद कागदपत्रे सापडतील त्यांनी ७ दिवसांच्या आत खालील पत्त्यावर संपर्क साधावा. निर्धारित वेळेत कोणाकडूनही प्रतिसाद किंवा आक्षेप न मिळाल्यास, आमचा क्लायंट पुढील कार्यवाही करेल.

तारीख: २६/०३/२०२५

**ॲड. अभिजीत राजेश कोठारी**
‘अभिजीत’, मुनोत इस्टेट, स्टेशन रोड,
अहमदनगर ४१४००१.
मो. ९६०४२२९९९९

# कॅलिडोस्कोप

## पाण्याखालचं हॉटेल!



आलिशान आरामदायी हॉटेल ते ही समुद्रात पाण्याखाली असेल, तर ते कुणालाही आवडेल. समुद्राच्या आत जाणाऱ्या लिफ्टमधून बाहेर पडताच एका आलिशान हॉटेलमध्ये प्रवेश होतो. नंतर एका आलिशान बेडरूमकडे दिसते. हा एक लक्झरी किंग साइज बेड आहे, या आलिशान बेडरुममध्ये पर्सनल बसण्याची जागा, सेन्सर-संचलित शौचालय, वॉटर-ग्लास सिलिंग आणि समुद्राच्या आतील सुंदर दृश्य तुम्हाला मोहीत करतील. समुद्राच्या खालील असलेल्या या हॉटेलची मोहिनी कुणालाही होईल.

या हॉटेलमध्ये याआधी राहिलेल्या एका प्रवाशाने लिहिले, 'मी इथे या खोलीत राहिलो होतो, थोडा नर्व्हस होतो; पण हा एक सुंदर अनुभव होता.' अन्य एका युजरने लिहिले, 'कल्पना करा की जेव्हा रात्रीची वेळ असेल आणि येथे अंधार असेल, तुमच्या आजूबाजूला काय आहे हे माहिती नसता तुम्ही येथे झोपू शकता का?' तिसऱ्या एका युजरने लिहिलेय की अंडरवॉटरची मला भीती वाटते.

'द मुराका' नावाचे हे आलिशान दुमजली हॉटेल मालदीव येथील कॉनराड मालदीवच्या रंगाली आयलंड रिसॉर्टमध्ये आहे. वेबसाइट 'द डायजेस्ट ऑनलाइन'च्या मते हे हॉटेल समुद्रपातळीपासून १६ फूट खाली आत आहे, १८०-डिग्रीच्या घुमटाखाली याचे मास्टर बेडरूम आहे. या हॉटेलमध्ये २४-तास बटलर आणि शेफ, स्पा सेंटर, ऑन-कॉल फिटनेस ट्रेनर आणि वैयक्तिक जेट स्की अशा सुविधा आहेत.

## या देशांकडे नाही लिखित संविधान

भारतात लोकशाही आहे. या देशाच्या नागरिकांना संविधानाने विविध स्वातंत्र्यं बहाल केली आहे. भारताचं संविधान लिखित स्वरुपात आहे. आपल्या देशाचा गाडा संविधानानुसारच हाकला जातो. पण काही देशांमध्ये लिखित संविधान नाही. मग या देशांचा गाडा कशा प्रकारे हाकला जात असावा? जाणून घेऊ.

● ब्रिटिशांनी भारतावर राज्य केलं. पण या ब्रिटनकडे स्वत:चं संविधान नाही. वाचून आश्चर्य वाटलं असेल. पण हे खरं आहे. या देशात काही नियम तयार करण्यात आले होते. या नियमांना आधारभूत मानून इथे शासन चालवलं जातं. या नियमांना संविधानाइतकंच महत्त्व आहे. ब्रिटनमधले कायदे वेळ आणि परिस्थितीनुसार बदलता येतात. इथल्या संसदेकडे हे अधिकार आहेत.

● सौदी अरेबियामध्येही चित्रविचित्र प्रथा आहेत. इथल्या नियम, कायद्यांविषयी आपण जाणतोच. या देशालाही संविधान नाही. इथला राज्यकारभार कुराणातल्या वचनांनुसार चालतो.

● इस्रायलकडेही स्वत:चं संविधान नाही. स्वातंत्र्यानंतर इस्रायलमध्ये संविधान तयार करण्याच्या घडामोडींना वेग आला होता. पण संसदेत होणाऱ्या गदारोळामुळे हे शक्य झालं नाही. इथे अलिखित संविधानाला मान्यता देण्यात आली आहे.

● न्यूझीलंडमध्येही लिखित संविधान नाही. इथे अलिखित संविधान आहे. त्यानुसार इथलं शासन चालतं.










## बबलमध्ये बसा, वन्यप्राणी बघा



प्राण्यांना जंगलात मुक्तपणे विहार करताना बघणं कोणाला आवडणार नाही... जंगल सफारीदरम्यान विविध प्राणी न्याहाळता येतात. हे प्राणी आपल्या घरात अगदी निवांत फिरत असतात. हा अनुभव खूप अनोखा असतो. हे प्राणी बघण्यासाठी जीप किंवा बसमधून फिरावं लागतं. पण थायलंडमध्ये येणाऱ्या पर्यटकांना पारदर्शी बबलमध्ये बसून वन्य प्राणी न्याहाळता येणार आहेत. इथल्या अनंतरा गोल्डन ट्रँगल एलिफंट कॅम्प अँड रिसॉर्टमध्ये पारदर्शी बबल्स तयार करण्यात आले आहेत. या तंबूरुपी बबल्समध्ये बसून आजूबाजूचे हत्ती बघता येतील. हा जगातला पहिलाच प्रयत्न असल्याचा रिसॉर्टचा दावा आहे. या बबल्समध्ये मोठ्या आकाराचा बेड आणि लिव्हिंग रुम आहे. अर्थात हा जगावेगळा अनुभव घेण्यासाठी एका रात्रीचे ३५ हजार रुपये मोजून दोनजण बबलमध्ये राहू शकतील. हे बबल्स वातानुकुलीत आहेत. अशा बबल्समध्ये बसून वन्य प्राणी बघण्याचा अनुभव भन्नाट असेल यात काहीच शंका नाही.

## ऑफर मोफत निवासाची!

सिंगापूर:सिंगापूरचे पंचतारांकित हॉटेल त्यांच्या ग्राहकांना व्हाउचरद्वारे मोफत निवासाची ऑफर देतात. तुम्ही आलात आणि पाऊस पडला तर एका रात्रीच्या मुक्कामाचा संपूर्ण खर्च मोफत मिळतो. कोठेही बाहेर जायचे असेल, तर सर्वात आधी विचार येतो, हॉटेलचा. बुकिंग केले आहे का, तिथे काय सोयी आहेत, पैसे किती लागतील, याचा विचार केला जातो; पण एखाद्या हॉटेलने फुकट राहू दिले तर? होय, सिंगापूरमधील एक हॉटेल आपल्या ग्राहकांसाठी अशीच ऑफर देत आहे.



'सीएनए'च्या रिपोर्टनुसार, सिंगापूरमधील एका पंचतारांकित हॉटेलने आपल्या ग्राहकांसाठी एक अनोखी ऑफर आणली आहे. हे हॉटेल आपल्या पाहुण्यांना पावसामुळे त्यांचा दिवस खराब झाल्यास मोफत राहण्याची सुविधा तर देईलच;पण त्यांचा सर्व खर्चही उचलेल. सिंगापूरमध्ये अर्ध्या वर्षात अनेकदा पाऊस पडतो. त्यामुळे सिंगापूरच्या लायन सिटीमधील इंटरकॉंटिनेंटल हॉटेलने आपल्या ग्राहकांना खूश करण्यासाठी हे पाऊल उचलले आहे. यामागील हॉटेलचा उद्देश स्पष्ट आहे की आपल्या पाहुण्यांच्या सुट्ट्या खराब होऊ नयेत. हॉटेलचे व्यवस्थापक अँड्रेस क्रेमर यांनी सांगितले, की एके दिवशी मी माझ्या मित्रांसोबत लक्झरी प्रवास कसा करायचा याबद्दल बोलत होतो आणि एका मित्राने गमतीने मला चांगल्या हवामानाची हमी देण्यास सांगितले. हे माझ्या मनात खटकले आणि मी माझ्या हॉटेलमध्ये ते अंमलात आणले.

हॉटेलने ऑफरसाठी व्हाउचर सिस्टम ठेवली आहे. त्यात चेक इन करणाऱ्या पाहुण्यांना काही व्हाउचर दिले जातील, जे दिवसाच्या कोणत्याही चार तासांच्या ब्लॉकमध्ये पाऊस असल्यास वैध असतील. यासाठी हॉटेलची अट आहे की पाऊस १२० मिनिटे किंवा त्याहून अधिक काळ टिकला पाहिजे. हॉटेलच्या परिस्थितीनुसार, पाऊस पडल्यास, तुमचे व्हाउचर सक्रिय केले जाईल. तुम्ही ६ महिन्यांच्या आत कधीही हॉटेलला भेट देऊन हे व्हाउचर वापरू शकता.

## शुक्राची चांदणी...



चंद्रासह मंगळावरही जीवसृष्टीच्या अस्तित्त्वाच्या खुणा शोधल्या जात आहेत. भविष्यात मानवाला अंतराळात राहता यावं, यासाठीही प्रयत्न केले जात आहेत. येत्या काळात अंतराळ पर्यटनाला लोकप्रियता मिळाली तर आश्चर्य वाटायला नको! आता शुक्रावर मानवी वस्ती निर्माण करता येईल का, याबाबत चर्चा सुरू झाली आहे. शुक्र हा आकाशातला तेजस्वी ग्रह. शुक्राची ही चमचमती चांदणी अनेकांना आकर्षित करते. कविता, गाण्यांमध्ये या शुक्रताऱ्याचा उल्लेख असतो. ग्रहांना स्वत:चा प्रकाश नसतो. त्यामुळे ग्रह आकाशात फार तेजस्वी दिसत नाहीत. पण शुक्र आकाशात चमकत असतो. अर्थात शुक्रावर वसाहत करणं माणसाला शक्य नाही. त्याच्या पृष्ठभागावर सल्फ्युरिक ॲसिडचं भांडार आहे. शुक्रावर सल्फ्युरिक ॲसिडचं ढगांप्रमाणे आच्छादन आहे. त्यामुळे माणूस इथे थांबू शकत नाही. इथे माणसाची हाडंही काही क्षणात वितळून जातात. सूर्याच्या जवळ असल्यामुळे शुक्राचं तापमान ४२५ अंश सेल्सियसपर्यंत पोहोचतं. या ग्रहावर प्रचंड उष्णता असते. कोणतंही अंतराळ यान या ग्रहाच्या पृष्ठभागावर दोन तासांपेक्षा अधिक काळ थांबू शकत नाही. शुक्र ग्रहाच्या वातावरणात वायूंनी तयार झालेले ढग आहेत. त्यामुळे शुक्राच्या पृष्ठभागावरून कधीही सूर्याचं किंवा पृथ्वीचं दर्शन होणार नाही. शुक्रावरची परिस्थिती प्रचंड प्रतिकूल आहे. त्यामुळे इथे माणसाचं राहणं जवळपास अशक्य आहे.

## इथे आहे मद्यपानाला परवानगी!

आपल्या देशात बजेटला खूप महत्त्व आहे. बजेट सादर करणारा मंत्री हुशार असावा, त्याला अर्थशास्त्राचं ज्ञान असावं अशी आपली अपेक्षा असते. बजेटमुळे काय स्वस्त होणार, काय महागणार, कोणाला काय मिळालं यावर बरीच चर्चा होत असते. निर्मला सीतारामन या भारताच्या अर्थमंत्री आहेत. विविध देशांमध्ये बजेट सादर होतं. पण ब्रिटनमधलं बजेट खऱ्या अर्थाने अनोखं म्हणता येईल. इथे बजेट सादर करणाऱ्या मंत्र्याला चान्सलर म्हटलं जातं. कोणत्याही देशाची संसद म्हणजे लोकशाहीचं पवित्र मंदिर. अशा मंदिरात मद्यपान करून येणं चुकीचं आहे. पण ब्रिटनमध्ये चान्सलर मद्यपान करून बजेट सादर करू शकतो. त्याला तशी परवानगी असते. ब्रिटनची संसद म्हणजे हाऊस ऑफ कॉमन्सच्या नियमावलीत या बाबीचा समावेश आहे. मद्यपान करून बजेट सादर करण्याचा अधिकार फक्त चान्सलरला असतो. वर्षातला फक्त एकच दिवस चान्सलर मद्यपान करून संसदेत येऊ शकतो. त्यानंतर त्याला अशी परवानगी नसते. हा नियम ब्रिटनमध्ये अनेक दशकांपासून आहे. इथल्या लोकांना हा प्रकार अर्थहीन वाटतो. इतकंच नाही, तर इथे बजेट सादर करण्यासाठी १०० वर्षं एकाच ब्रीफकेसचा वापर करण्यात आला होता. १८६० मध्ये विलियम ग्लॅडस्टोन यांच्यासाठी ही ब्रीफकेस तयार करण्यात आली होती. स्कारलेट असं या ब्रीफकेसचं नाव होतं. १९६५ पर्यंत याच ब्रीफकेसमध्ये बजेट असायचं. १९६५ मध्ये तत्कालीन चँसेलर जेम्स कॅलेघन यांनी स्वत:साठी नवी ब्रीफकेस तयार करून घेतली आणि स्कारलेटला बाद केलं.



## वधूच्या अशाही मागण्या!

लग्न हे प्रत्येक व्यक्तीचे स्वप्न असते. प्रत्येक व्यक्तीला वैवाहिक जीवन जगायचे असते. अशा परिस्थितीत, बरेच लोक त्यांच्या लग्नापूर्वी एकदा तरी बॅचलर पार्टीसाठी बाहेर पडतात. हा मोठ्या शहरांच्या परंपरेचा भाग आहे. परदेशात तर बॅचलर पार्ट्यांमध्ये मर्यादा ओलांडल्या जातात. या मर्यादा लक्षात घेऊन एका वधूने लग्नाआधी बॅचलोरेट पार्टीसाठी आपल्या मंगेतराला एक यादी दिली, जी आश्चर्यचकित करणारी आणि हसवणारी आहे.



इसाबेल ब्लाउंट २४ वर्षांची असून ती इंग्लंडमधील लीसेस्टरशायरमध्ये राहते. अलीकडे हिड्ड नावाच्या वेबसाईटशी बोलताना इसाबेलने तिच्या मंगेतराला बॅचलर पार्टीसाठी दिलेल्या नियमांची यादी समजावून सांगितली. काही दिवसांपूर्वी इसाबेलने 'सोशल मीडिया' प्लॅटफॉर्म टिकटॉकवर एक व्हिडीओ शेअर केला होता आणि त्यासाठी बनवलेल्या नियमांची यादी स्पष्ट केली होती. बॅचलर पार्टीचे नियम शेअर केले होते. जे आता 'सोशल मीडिया'वर व्हायरल होत आहेत. हे नियम विनोदाने बनवण्यात आल्याचे इसाबेलने सांगितले. तिची मंगेतर काही लहान मूल नाही, ज्याला हे सर्व समजावून सांगितले पाहिजे. तरीही हे नियम खूप सोपे आहेत जे त्यांचे भावी पती सहजपणे पाळू शकतात, तरीही मी हे दोन नियम बनवले आहेत, माझ्या पतीने त्यांचे पालन करावे आणि ज्या गोष्टींपासून दूर राहण्यास सांगितले आहे त्यापासून दूर राहावे अशी माझी इच्छा आहे.

इसाबेलने सर्वप्रथम तिच्या पतीला आक्षेपार्ह गोष्टींपासून दूर राहण्यास सांगितले, याशिवाय इसाबेलने तिच्या भावी पतीला संपूर्ण प्रवासादरम्यान स्वतःशी बोलण्यास सांगितले. यादीत पुढे, इसाबेलने तिच्या मंगेतरला मुलींच्या संपर्कात येऊ नका आणि त्यांच्यापासून दूर राहण्यास सांगितले. इसाबेलने तिच्या भावी पतीला नियमांमध्ये सांगितले, की तुम्ही मजा करू शकता; परंतु मी आणि माझे मित्र जे करतात त्यापेक्षा जास्त नाही. याशिवाय इसाबेलने तिच्या भावी पतीला पार्टीचे व्हिडीओ आणि फोटो पाठवण्यास सांगितले. आणि म्हणाली, की मी परत आल्यावर मला माझ्यासाठीही भेटवस्तू हव्या आहेत.नाही. याशिवाय इसाबेलने तिच्या भावी पतीला पार्टीचे व्हिडीओ आणि फोटो पाठवण्यास सांगितले. आणि म्हणाली, की मी परत आल्यावर मला माझ्यासाठीही भेटवस्तू हव्या आहेत.

## स्टंट पडला महागात!

लग्नाची मिरवणूक आणि लग्न हे प्रत्येक व्यक्तीचे स्वप्न असते. आपले लग्न कोणत्याही अडथळ्याशिवाय पूर्ण व्हावे, अशी प्रत्येकाची इच्छा असते; पण जर एखाद्या व्यक्तीला त्याच्या लग्नाच्या दिवशी पोलिसांनी पकडले तर? अशी घटना घडली आहे. पोलिसांनी एका वराला त्याच्या लग्नाच्या दिवशी पोलिसांनी पकडले तर? अशी घटना घडली आहे. पोलिसांनी एका वराला त्याच्या लग्नाची मिरवणूक काढताना रस्त्याच्या मध्येच थांबवले नाही, तर वराची गाडीही ताब्यात घेतली.



वरात निघाली, तेव्हा वर उत्साहात होता. उत्साहाच्या भरात तो लग्नाच्या मिरवणुकीच्या गाडीवर चढून स्टंट करू लागला. हायवेच्या मधोमध गाडीच्या छतावर उभे राहून तो स्टंट करीत होता आणि ड्रोनच्या सहाय्याने त्याचे शूट केले जात होते. पोलिसांना याची माहिती मिळताच पोलिस प्रशासनाने तात्काळ कारवाई करत वराची गाडी जप्त केली. या वेळी वऱ्हाडी मंडळींनी पोलिसांशी चर्चा केली; परंतु पोलिसांनी कोणाचेही न ऐकून गाडी पोलिस ठाण्यात आणली. मीडिया रिपोर्टस्नुसार, अंकित नावाच्या व्यक्तीची लग्नाची मिरवणूक सहारनपूरच्या भायला गावातून मेरठच्या कुसावली गावात जात होती. त्यानंतर दिल्ली-डेहराडून महामार्गावर असलेल्या मन्सूरपूर पोलिस ठाण्याच्या हद्दीत वराने गाडीच्या छतावर चढून गोळी झाडण्याचा स्टंट सुरू केला. पोलिसांना याची माहिती मिळताच पोलिसांनी तात्काळ कारवाई केली. वराकडून करण्यात येत असलेला स्टंट तात्काळ थांबवण्यात आला आणि गाडी पोलिसांनी ताब्यात घेतली. वऱ्हाडी मंडळी आणि पोलिसांमध्ये बराच वेळ वादावादी झाली; मात्र पोलिसांनी कोणाचेही न ऐकून कारवाई केली.




## कुत्र्यावरच्या प्रेमापोटी...

पाळीव प्राण्यांवर मालकांचं खूप प्रेम असतं. या मुक्या जीवांसाठी काहीही करायची त्यांची तयारी असते. अमेरिकेतल्या एका सीईओने आपल्या लाडक्या कुत्र्याचा जीव वाचवणाऱ्या डॉक्टरचे आभार मानण्यासाठी एक जाहिरात तयार केली आहे. या सीईओने जाहिरातीवर सहा दशलक्ष डॉलर्स म्हणजे ४२.८३ कोटी रुपये खर्च केले आहेत. या जाहिरातीचं प्रसारण सुपर बाउल फूटबॉल स्पर्धेदरम्यान केलं जाईल. ही स्पर्धा अमेरिकेत खूप लोकप्रिय आहे. चारचाकी वाहनासाठी लागणाऱ्या विविध वस्तूंची निर्मिती करणाऱ्या 'वेदरटेक' या कंपनीचे सीईओ डेव्हिड मॅकलिन यांच्या 'स्काउट' नावाच्या कुत्र्याला ट्यूमरचं निदान झालं. यानंतर त्याच्या जिवंत राहण्याची शक्यता खूपच कमी होती. पण आज स्काउट रोगमुक्त झाला आहे. डेव्हिड यांनी स्काउटला वाचवण्यासाठी प्रयत्न करण्याचा निर्णय घेतला. मग गेल्या वर्षी जूनमध्ये त्याला 'युनिव्हर्सिटी ऑफ विस्कॉन्सिन स्कूल ऑफ वेटर्नरी मेडिसिन' इथे नेण्यात आलं. तिथे त्याला केमोथेरेपी, इम्युनोथेरेपी आणि रेडिएशन थेरेपी देण्यात आली. सप्टेंबर महिन्यात त्याच्या ट्यूमरचा आकार जवळपास ९० टक्क्यांनी कमी झाला आणि मग ट्यूमर काढून टाकण्यात आला. यामुळे स्काउट पूर्ण बरा झाला. यामुळे डॉक्टरांचे आभार मानण्यासोबतच प्राण्यांना होणाऱ्या आजारांबाबत जागरूकता निर्माण करण्यासाठी त्यांनी तब्बल सहा दशलक्ष डॉलर्स खर्चून एक जाहिरात तयार केली.

## गुमनाम है कोई...

इजिप्तमध्ये असंख्य ममी आहेत. हजारो वर्षांपासूनच्या या ममी पिरॅमिडमध्ये जपून ठेवण्यात आल्या आहेत. या ममीज म्हणजे जगातलं एक आश्चर्यच म्हणता येईल. ममीवर आधारित बरेच चित्रपट आले. या चित्रपटांमधून बरंच काही भयावह दाखवण्यात आलं. ब्रिटनमध्येही असंच काही तरी घडलं. इथे एका पेटीत ममी ठेवली होती. या पेटीतून चित्रविचित्र आवाज यायला सुरूवात झाली. मग शास्त्रज्ञांनी हा आवाज ध्वनिमुद्रित करायचा निर्णय घेतला. रेकॉर्ड झालेला हा आवाज ऐकून शास्त्रज्ञांनाही धक्काच बसला. ब्रिटनमधल्या लीड्स सीटी म्युझियममध्ये एक ममी ठेवण्यात आली आहे. निसियामून असं या ममीचं नाव आहे.



ही ममी तीन हजार वर्षांपूर्वीची असल्याचं म्हटलं जातं. इजिप्तचा राजा फॅरो रामसेस ११ च्या दरबारात काम करणाऱ्या एका पुजाऱ्याची ही ममी असल्याचं बोललं जातं. हा पुजारी राजासाठी खबरी म्हणून काम करायचा. तसंच तो त्याला धार्मिक गाणीही ऐकवायचा. या ममीच्या वरून हवा गेल्यानंतर तिच्या तोंडातून विचित्र आवाज येत असे. हे बघून शास्त्रज्ञांची उत्सुकता चाळवली. त्यांनी हा आवाज रेकॉर्ड करायचं ठरवलं. मग त्यांनी ममीच्या गळ्याचं सीटी स्कॅन केलं. मग थ्रीडी प्रिंटर तंत्रज्ञानाने ममीचं स्वरयंत्र तयार केलं. मग ममीच्या गळ्यातून आवाज काढण्यात आला. त्यावेळी ममीच्या गळ्यातून कण्हण्याचा आवाज आला. ममीवरून हवा गेल्यानंतर येणाऱ्या आवाजाशी हा आवाज तंतोतंत जुळला. ममीच्या जीभेचा काही भाग गायब असल्याचं सीटी स्कॅन दरम्यान लक्षात आलं. गेल्या तीन हजार वर्षांमध्ये ममीची जीभ सडून गेल्याचं शास्त्रज्ञांचं म्हणणं आहे. सध्या या आवाजाचा व्हिडिओ व्हायरल झाला आहे.

# स्वस्थ जीवन आणि रोग मुक्तिचा संदेश देणाऱ्या व्याख्यानाने अहिल्यानगरमधील श्रोते भारावले



भगवान महावीर व्याख्यानमालेचे पाचवे पुष्प 'आहार आणि आरोग्य' या विषयावर गुंफताना अतुल शहा.

## भगवान महावीर व्याख्यानमाला - पुष्प पाचवे

नगर - निसर्गाच्या सान्निध्यात राहून शुध्द शाकाहार केल्यास कोणताही आजार आपल्या जवळ फिरकूही शकत नाही, हे अतुल शहा (मुंबई) यांनी ठामपणे आणि स्वानुभवातून सांगितले. स्वस्थ जीवन आणि रोग मुक्तिचा संदेश देणाऱ्या या व्याख्यानाने श्रोते मंत्रमुग्ध झाले.

राष्ट्रसंत आचार्य सम्राट श्री आनंदऋषिजी महाराज यांच्या ३३ व्या पुण्य स्मृतीदिन व १२५ व्या जन्मोत्सवानिमित्त जैन सोशल फेडरेशनने प्रबुध्द विचारक आदर्शऋषीजी महाराज यांच्या प्रेरणेने सुरू केलेल्या भगवान महावीर व्याख्यानमालेचे पाचवे पुष्प 'आहार आणि आरोग्य' या विषयावर गुंफताना आनंदधाममध्ये ते बोलत होते.

निखिलेंद्र लोढा व सुरेश कटारिया यांच्या हस्ते वक्त्यांचा सन्मान करण्यात आला. प्रसाद बेडेकर यांनी सूत्रसंचालन केले.

श्री. शहा पुढे म्हणाले, आपल्या आरोग्याबाबत आपण सदैव जागृत राहिले पाहिजे. आपला आहार व विहार निरोगी जीवनाची गुरूकिल्लीच आपल्या हाती देतो. मेडिकल सायन्सकडे उपाय नसलेला आजार मला झालेला असताना मी आहार शुध्द शाकाहारी घेऊन आजारावर यशस्वीपणे मात करू शकलो. भगवंताने बनवलेले आपले मानवी शरिर अद्भूत आहे. ते आतूनच आपोआप दुरूस्त होत जाते त्याकरिता औषधं घ्यायची गरज नसते. ९०% आजार शरीरच बरे करते. आजार एकदम होत नाहीत. त्याची लक्षणे ५ ते १० वर्षे अगोदर दिसतात. त्याकडे दुर्लक्ष केले तरच आजाराची एन्ट्री होते.

जंगलातील पशु-पक्षी आजारी पडले तर कोणता डॉक्टर त्यांच्यावर उपचार करतो? असा प्रश्न करून त्यांनी उपस्थितांचे वास्तव परिस्थितीकडे लक्ष वेधले. निसर्गाने उपलब्ध करून दिलेल्या शाकाहारी भोजनापासून माणूस भटकल्याने आजारी पडू लागला. नैसर्गिक भोजन हे अमृत आहे. पृथ्वी (अन्न), जल (पाणी), अग्नि (सूर्यकिरण), वायू (श्वास) आणि आकाश (उपवास) या पंचतत्वांचे संतुलन आपले स्वास्थ उत्तम ठेवते. हे संतुलन बिघडले की माणूस आजारी पडतो. शरिराच्या क्षमतेपेक्षा जास्त खाणारे सारखे आजारी पडतात. भगवान महावीरांनी सांगितले आहे की एका हातावर बसेल इतकेच खा. पाणी शरिराची सफाई करते म्हणून थंडीत दररोज दीड लिटर आणि उन्हाळ्यात दररोज अडीच लिटर पाणी पिलेच पाहिजे. तसेच नियमितपणे किमान २० मिनिटं प्राणायाम केला पाहिजे. आठवड्यातून किमान एक तास सकाळच्या उन्हात बसलेच पाहिजे.

प्राण्यांमध्ये सर्वांत जास्त बुध्दीमान मानव प्राणी असूनही निसर्गाची साथ सोडत चालल्याने आणि काय खावे? हे न कळल्याने आजारी पडू लागला आहे. अल्पोपहार करताना सॅलड खा. फलाहार करा. भाज्यांचा रस काढून प्या. आज भोजन म्हणजे जीभेचे चोचले आणि मनोरंजन झाले आहे. सारखे खाणे आणि जरूरी नसताना भरपेट जेवणे यामुळे पोट बाहेर येते. पाणीही न पिता उपवास करा. वर्षभरात एकदा आठवडाभर उपवास करा आरोग्य सुधारेल. आजारमुक्त रहाल. आपल्या देशाची प्रगती आपण आजारमुक्त रहाण्यातून होणार आहे. एकमेव भारत देशात ताजे भोजन मिळते. चांगले खा. मस्त रहा. आजारमुक्त जीवनाचा आनंद घ्या, असे श्री. शहा यांनी विविध उदाहरणे देत स्लाईड शो आधारे सांगितले. व्याख्यानास शहरासह उपनगरातील ज्येष्ठ स्त्री-पुरूष उपस्थित होते. सरोजताई कटारिया यांनी आभार मानले.



महानगरपालिकेत २५ मार्च रोजी आशा दिवस साजरा करण्यात आला.

# अहिल्यानगर महापालिकेत आशा दिवस साजरा, सर्वोत्कृष्ट कार्य करणाऱ्या तीन सेविकांना पुरस्कार

### जागतिक क्षय रोग दिनानिमित्त आयोजित रांगोळी स्पर्धेतील विजेत्या आरोग्य केंद्रांना पारितोषिके

नगर - महानगरपालिकेच्या वतीने शहरात आरोग्य विषयक अनेक उपक्रम राबवण्यात येतात. यात आरोग्य सेवेसह सर्वेक्ष, उपाययोजना, जनजागृतीमध्ये आशा सेविकांचे मोठे योगदान आहे. त्यांच्या कार्याचा सन्मान करण्याच्या उद्देशाने आशा दिवस साजरा करण्यात आला. यानिमित्ताने अहिल्यानगर शहरात महानगरपालिकेच्यावतीने उत्कृष्ट कार्य करणाऱ्या तीन आशा सेविकांचा पुरस्कार देऊन सन्मान करण्यात आला आहे. त्यांच्यासह सर्वच आशा सेविकांचे कार्य चांगले असल्याचे प्रतिपादन आयुक्त तथा प्रशासक यशवंत डांगे यांनी केले.

मनपात २५ मार्च रोजी आशा दिवस साजरा करण्यात आला. तसेच, जागतिक क्षयरोग दिनानिमित्त महानगरपालिकेच्या आरोग्य केंद्रातील कर्मचाऱ्यांसाठी, आशा सेविकांसाठी क्षय रोग या विषयावर जनजागृतीसाठी रांगोळी स्पर्धा घेण्यात आल्या. यातील विजेत्या आरोग्य केंद्रांसह उत्कृष्ट कार्य करणाऱ्या आशा सेविकांना पुरस्कार देण्यात आले. महानगरपालिकेच्या आवारात झालेल्या रांगोळी स्पर्धेतून कर्मचाऱ्यांनी क्षय रोगाबाबत जनजागृती केली.

महानगरपालिकेच्यावतीने हसीना शेख (मुकुंदनगर), सुनीता भोसले (तोफखाना) व स्वाती भणगे (केडगाव) या तीन आशा सेविकांना उत्कृष्ट कार्याबद्दल अनुक्रमे ५००१ रुपये, ३००१ रुपये व २००१ रुपये रकमेचा पुरस्कार देण्यात आला. तसेच, रांगोळी स्पर्धेत प्रथम क्रमांक केडगाव आरोग्य केंद्र १००१ रुपये, द्वितीय क्रमांक महात्मा फुले आरोग्य केंद्र ७०१ रुपये, तृतीय क्रमांक सिव्हिल (सावेडी) आरोग्य केंद्र ५०१ रुपये, उत्तेजनार्थ जिजामाता आरोग्य केंद्र ४०१ रुपये या विजेत्यांना पारितोषिके देण्यात आली. उपायुक्त प्रियांका शिंदे, सहाय्यक आयुक्त सपना वसावा, कविता माने यांनी या रांगोळी स्पर्धेचे परीक्षण केले.

# एकल महिलांच्या सक्षमीकरणासाठी आराखडा तयार करा

### जिल्हा कौशल्य विकास समितीच्या बैठकीत पंकज आशिया यांच्या सूचना

नगर - जिल्ह्यातील एकल महिलांच्या सक्षमीकरणासाठी आराखडा तयार करा, अशी सूचना अहिल्यानगरचे जिल्हाधिकारी डॉ. पंकज आशिया यांनी केली.

जिल्हा कौशल्य विकास समितीच्या कार्यकारी समितीची बैठक जिल्हाधिकारी कार्यालयात झाली. त्यावेळी जिल्हाधिकारी डॉ. पंकज आशिया यांनी ही सूचना केली. यावेळी जिल्हा कौशल्य विकास, रोजगार व उद्योजकता विभागाचे सहाय्यक आयुक्त एन.एम.सूर्यवंशी, कौशल्य विकास समितीचे सदस्य विनायकराव देशमुख, जिल्हा परिषदेचे उपमुख्य कार्यकारी अधिकारी मनोज ससे, जिल्हा खादी व ग्रामोद्योग अधिकारी बाळासाहेब मुंडे, जिल्हा अग्रणी बँकेचे आशिष नवले, जिल्हा महिला व बालविकास अधिकारी नारायण कराळे, अहिल्यानगर महापालिकेच्या सुप्रिया घोगरे, जिल्हा ग्रामीण विकास यंत्रणा (उमेद)चे सोमनाथ जगताप, महिला आर्थिक विकास महामंडळाचे मच्छिंद्र कुर्हे, औद्योगिक प्रशिक्षण संस्थेचे प्राचार्य के.ए. जहागीरदार, जनशिक्षण संस्थेच्या कुंदा शिंदे, मोहन कांडेकर आदी उपस्थित होते.



जिल्हा कौशल्य विकास कार्यकारी समितीच्या बैठकीत बोलताना जिल्हाधिकारी पंकज आशिया आदी.

जिल्हाधिकारी डॉ. पंकज आशिया म्हणाले, उपलब्ध सर्वेक्षणानुसार जिल्ह्यातील एकल महिलांची संख्या एक लाखापर्यंत असली तरी त्यापैकी २५ ते ४५ वयोगटातील प्रशिक्षण घेऊ इच्छिणाऱ्या महिलांवर लक्ष केंद्रित करणे आवश्यक आहे. त्या दृष्टीने जिल्हा ग्रामीण विकास यंत्रणेने ग्रामीण भागातील व अहिल्यानगर महापालिकेने शहरी भागातील आवश्यक ती माहिती एप्रिल अखेर संकलित करावी. या माहितीच्या आधारे एकल महिलांना आर्थिक दृष्ट्या सक्षम करण्यासाठी उपक्रम हाती घेता येईल.

यावेळी विनायक देशमुख म्हणाले, २०२५ हे वर्ष आपण पुण्यश्लोक राजमाता अहिल्यादेवी होळकर यांचे तिसरे जन्मशताब्दी वर्ष म्हणून साजरे करीत आहोत. राज्याचे जलसंपदा मंत्री व जिल्ह्याचे पालकमंत्री राधाकृष्ण विखे पा. यांच्या संकल्पनेतून व मार्गदर्शनाने एकल महिलांना आर्थिक दृष्ट्या सक्षम करण्याचे काम हाती घेण्यात आले आहे. या वर्षात किमान ५,००० एकल महिला कुटुंबांना सक्षम करण्याचा निर्धार आहे. हे काम केवळ महिलांना प्रशिक्षण देण्यापुरते मर्यादित नसून त्यांचे व्यवसाय सुरू करून त्यांना बाजार पेठ उपलब्ध करून देणे आणि कायमस्वरूपी उत्पन्नाची व्यवस्था निर्माण करण्यासाठी काम केले जावे, असा पालकमंत्री राधाकृष्ण विखे पाटील यांचा प्रयत्न आहे.

प्रारंभी जिल्हा कौशल्य विकास रोजगार व उद्योजकता विभागाचे सहाय्यक आयुक्त सूर्यवंशी यांनी सादरीकरण करून जिल्ह्यातील सद्य कौशल्य विकास कार्यक्रमाची माहिती दिली. त्याचप्रमाणे २०२५ ते २०२८ या कालावधीतील कौशल्य विकासाचा आराखडा सादर केला.

या संदर्भातील पुढील बैठक एप्रिल महिन्यात राधाकृष्ण विखे पा. यांच्या प्रमुख उपस्थितीत होणार असल्याची माहिती देण्यात आली.



नगर शहरासह तालुक्यातील ठाकरे गटाचे प्रमुख पदाधिकारी शिवसेना शिंदे गटात दाखल होण्यासाठी मुंबईकडे रवाना झाले.

# नगर शहरासह तालुक्यातील ठाकरे गटाचे प्रमुख पदाधिकारी शिवसेना शिंदे गटात दाखल होण्यासाठी मुंबईकडे रवाना

नगर - नगर शहर व तालुक्यातील शिवसेनेचे (उद्धव ठाकरे गट) प्रमुख नेते व पदाधिकारी शिवसेनेचे जिल्हाप्रमुख अनिल शिंदे आणि संपर्कप्रमुख सचिन जाधव यांच्या नेतृत्वाखाली शिवसेनेत (एकनाथ शिंदे गट) प्रवेश करण्यासाठी २६ मार्च मुंबईकडे रवाना झाले.

जुने बस स्थानक येथील छत्रपती शिवाजी महाराजांच्या अश्वारूढ पुतळ्याला पुष्पहार अर्पण करून हे सर्व पदाधिकारी मुंबईकडे रवाना झाले. यावेळी बाबुटायरवाले, दिलीप सातपुते, संभाजी कदम, बाळासाहेब बोराटे आदी पदाधिकारी व कार्यकर्ते उपस्थित होते.

उद्धव ठाकरे गटाला सोडचिठ्ठी देऊन एकनाथ शिंदे गटात प्रवेश करणाऱ्यांमध्ये तालुक्यातील आणि जिल्ह्यातील अनेक नेत्यांचा समावेश आहे.

प्रमुख नेत्यांची यादी : संदेश तुकाराम कार्ले (उपजिल्हाप्रमुख तथा जिल्हा परिषद सदस्य), शरद मधुकर झोडगे (जिल्हा परिषद सदस्य), रामदास रंगनाथ भोर (माजी सभापती, पंचायत समिती), डॉ. दिलीप दत्तात्रय पवार (माजी उपसभापती, पंचायत समिती), गुलाब शिंदे (पंचायत समिती सदस्य), प्रकाश कुलट (उपतालुका प्रमुख), विठ्ठल हंडोरे (सरपंच, घोसपुरी), बाबासाहेब भोर (चेअरमन, भोरवाडी), नवनाथ वायाळ (माजी सरपंच, भोरवाडी), बाबासाहेब टकले (माजी सरपंच, भोयरे पठार), अशोक दहिफळे (उपजिल्हा प्रमुख), सुरेश क्षिरसागर (महाराष्ट्र एस.टी. कामगार सेना, महाराष्ट्र उपाध्यक्ष), विठ्ठलराव जाधव (उपशहर प्रमुख), शरदराव शेडाळे (भारतीय कामगार सेना), संजय आव्हाड (वाहतूक सेना).

# श्री संत गोरोबा काकांचे मंदिराची प्रास्तावित कमानची जागा बदला अन्यथा महाराष्ट्र कुंभार महासंघ व समाज संघटनेचे २ एप्रिलला उपोषण

### शासन स्तरावर प्रश्न सोडविण्यासाठी निवासी उपजिल्हाधिकारी राजेंद्रकुमार पाटील यांना निवेदनाद्वारे इशारा





महाराष्ट्र राज्य कुंभार समाज महासंघ व कुंभार समाज संघटना अहिल्यानगरच्या वतीने श्री क्षेत्र तेर (जि. धाराशिव) येथील श्री संत गोरोबा काकांचे मंदिराची प्रास्तावित कमानची (महाद्वार) जागा बदलण्याची मागणी जिल्हाधिकारी यांच्याकडे करताना कुंभार समाजाचे पदाधिकारी. शेजारील छायाचित्रात येथील कमान वेस.

नगर - महाराष्ट्र राज्य कुंभार समाज महासंघ व कुंभार समाज संघटना अहिल्यानगरच्या वतीने श्री क्षेत्र तेर (जि. धाराशिव) येथील श्री संत गोरोबा काकांचे मंदिराची प्रास्तावित कमानची (महाद्वार) जागा बदलण्याची मागणी करण्यात आली आहे. शासकीय स्तरावर हा प्रश्न न सुटल्यास जिल्ह्यातील कुंभार समाज बांधवांच्या वतीने २ एप्रिल रोजी जिल्हाधिकारी कार्यालया समोर उपोषण करण्याचा इशारा देण्यात आला आहे.

या मागणीसाठी महाराष्ट्र राज्य कुंभार समाज महासंघ व कुंभार समाज संघटनेच्या शिष्टमंडळाने निवासी उपजिल्हाधिकारी राजेंद्रकुमार पाटील यांना निवेदन दिले. याप्रसंगी संघटनेचे अध्यक्ष डॉ. अशोकराव सोनवणे, सरचिटणीस विनायक राऊत, जिल्हाध्यक्ष नितीन घोडके, पांडुरंग क्षीरसागर, गणेश डेंगळे, कैलास राऊत, भगवान खटावकर, रवी देशमुख, कुमार सुसरे, सागर राजापुरे, नितीन राजापुरे, संतोष मेहेत्रे, विठ्ठलराव मोरे, भरत जगदाळे, भानुदास गोरे, सुभाष जोर्वेकर, विनायक गायकवाड आदी उपस्थित होते.

मौजे तेर (जि. धाराशिव) येथील श्री संत गोरोबाकाका व शिवमंदिर ट्रस्टचे परिसरात पाण्याच्या टाकीजवळ (महाद्वार) कमानच्या कामाचे उद्घाटन आ. राणा जगजीतसिंह पाटील यांनी केले आहे. परंतु या ठिकाणी पाण्याची टाकी व पुढील जागा शिल्लक आहे. त्यामुळे ती कमान मुरुड रस्त्यालगत जागेत करण्यात यावी, अशी मागणी अहिल्यानगर कुंभार समाजच्या वतीने करण्यात आली आहे. तसेच श्री संत गोरोबा काकांच्या जुने मंदिराचे पूर्व बाजूच्या भिंतीचे काम अनेक वर्षापासून अद्याप पर्यंत झालेले नाही. त्यामुळे जे महाद्वाराचे काम आहे ते काम दक्षिण बाजूस न करता पूर्व बाजूस करावे. पूर्व द्वारातून बाहेर आल्यानंतर समोरच मागे पत्रव्यवहार करून सुद्धा शौचालयाचे काम मंदिराच्या पूर्व बाजूस केलेले आहे, तरी ते शौचालय पाडण्यात येऊन ते मंदिराच्या दक्षिण बाजूस करण्याचे निवेदनात म्हंटले आहे.

या मागणीसाठी धाराशिव येथे माजी सरपंच महादेव खटावकर २ एप्रिल रोजी आमरण उपोषणासाठी बसणार आहे. त्या अनुषंगाने महाराष्ट्र कुंभार समाज महासंघ व सर्व कुंभार समाज अहिल्यानगरच्या वतीने त्यांच्या उपोषणाला पाठिंबा देऊन अहिल्यानगरच्या जिल्हाधिकारी कार्यालया समोर उपोषण करण्याचे स्पष्ट करण्यात आले आहे.

# सीए च्या फर्मचे बनावट सही, शिक्के व कागदपत्रे वापरून टॅक्स कन्सल्टंटने केली १६ लाख ८१ हजार रुपयांची फसवणूक

नगर - बनावट कागदपत्रे बनवून सी ए च्या नावाचे बनावट शिक्के बनवून त्या आधारे ग्राहकांचे देयके बँक खात्यात टाकून ते पैसे काढून घेऊन ते वैयक्तीक कामासाठी खर्च करून नगरमधील सी ए ची १६ लाख ८१ हजार २९९ रुपयांची फसवणूक केल्याची घटना ३१ मार्च २०२१ ते ३१ मार्च २०२३ दरम्यान घडली. ही घटना उघडकीस आल्यावर एका टॅक्स कन्सल्टंट वर २५ मार्च रोजी कोतवाली पोलिस ठाण्यात फसवणुकीचा गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

या बाबत सी ए देवेंद्र आण्णासाहेब पाटील (वय ३०, रा.ओम शांती, नंदनवन कॉलनी गुलमोहर रोड, सावेडी) यांनी दिलेल्या फिर्यादीत म्हटले आहे की सचिन आप्पासाहेब दुधाडे (रा.विशाल ऑईल डेपोसमोर, माहेश्वरी पार्क, बारस्कर नगर, भिस्तबाग महाला जवळ, सावेडी अ.नगर) हा अकाऊन्ट आणि टॅक्स जी.एस.टी.व्हॅट चा परतावा भरण्याचे काम करतो. ११ एप्रिल २०२३ रोजी सचिन दुधाडे याने देवेंद्र पाटील यांच्याकडे सुर्या हॉल मार्किंग या फर्मसाठी हॉल मार्किंग ब्युरोचे रॉयल्टी पे केल्याचे प्रमाणपत्राची मागणी केली. त्याप्रमाणे सचिन दुधाडे याने त्याचेकडील फाईल दाखविली. त्या फाईलमध्ये असलेल्या कागपत्राची पडताळणी करुन पाटील यांनी त्याला प्रमाणपत्र दिले.

त्यानंतर ही सचिन दुधाडे यास तुषार कपाळे यांचे आयकर परतावा भरण्यासाठी लागणारे कागपत्राची पडताळणी करुन आयकर परतावा भरला हे पाहुन व त्याचे प्रमाणपत्र हे सचिन दुधाडे यांचेकडे दिले. १४ जानेवारी २०२५ रोजी पाटील यांना समजले की, सचिन दुधाडे याने पाटील यांच्या फर्मच्या नावाचा, सहीचा व शिक्क्याचा वापर करून बनावट प्रमाणपत्र बनवुन राजेश बाळासाहेब भोसले (सुर्या हॉल मार्किंग) यांचे कडुन तसेच त्याचा भाऊ किशोर बाळासाहेब पाटील यांचे इन्कम टॅक्स, जी.एस.टी. बिलाचा परतावा भरण्यासाठी त्यांचेकडुन सन २०२१ पासुन वेळोवेळी १६ लाख ८१ हजार २९९ रुपये चेक द्वारे घेऊन ते चेक हे त्याचे बैंक ऑफ बडोदा या बैंकेत असलेल्या करन्ट अकाऊंन्ट एस. डी. असोसिएट या अकांउन्ट मध्ये वटवुन ते पैसे हे त्याच्या वैयक्तीक कारणासाठी वापरले असल्याचे समजले. सचिन दुधाडे याने आणखी काहीजणांना वरील प्रमाणे फसवले असल्याची शंका असल्याचे पाटील यांनी फिर्यादीत म्हटले आहे. या प्रकरणी देवेंद्र पाटील यांनी दिलेल्या फिर्यादीवरुन सचिन दुधाडे याच्याविरुद्ध भारतीय दंड संहिता ४०९, ४२०, ४६४, ४६५, ४७१, ४७२ अन्वये फसवणुकीच्या गुन्ह्याची नोंद केली.

# महाराष्ट्र राज्य विधानसभा उपाध्यक्षपदी अण्णा बनसोडे यांची बिनविरोध निवड



मुंबई - मातीशी नाळ जोडलेल्या सामान्य कार्यकर्त्याची महाराष्ट्र विधानसभेच्या उपाध्यक्षपदी निवड होणे हे भारतीय संविधानाने दिलेल्या संधीच्या समानतेचे उत्तम उदाहरण आहे. राज्याच्या विधानमंडळाला मोठी गौरवशाली परंपरा आहे. या परंपरेला पुढे नेण्याची जबाबदारी सर्वांची आहे. अण्णा बनसोडे उपाध्यक्ष झाले, ही घटना केवळ त्यांचा गौरव नसून राज्यातील १३ कोटी जनतेचा अभिमान आहे. संविधानाने दिलेल्या समानतेच्या हक्कामुळेच आज सामान्य माणूसही उच्च पदावर पोहोचू शकतो असे, मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी सांगितले.

विधानसभा उपाध्यक्षपदी राष्ट्रवादी काँग्रेसचे अण्णा बनसोडे यांची एकमताने निवड करण्यात आली. या निवडीबद्दल मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी अभिनंदनपर प्रस्ताव मांडला, त्यावेळी ते बोलत होते. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी अण्णा बनसोडे यांच्या निवडीबद्दल अभिनंदन करताना त्यांचा राजकीय प्रवास आणि अनुभव यांची प्रशंसा केली.

मुख्यमंत्री फडणवीस म्हणाले, महाराष्ट्र विधानमंडळ देशातील सर्वाधिक काळ चालणाऱ्या सभागृहांपैकी एक आहे. या सभागृहाच्या परंपरेला पुढे नेण्यासाठी अध्यक्ष, उपाध्यक्ष आणि सर्व सदस्यांनी समन्वयाने काम करून या सभागृहाचा अधिक लौकिक वाढवूया. उपाध्यक्ष पद हे महाराष्ट्र विधानसभेतील सन्मानाचे पद आहे. अनेक दिग्गज नेत्यांनी या पदाचा गौरव वाढविला आहे.अण्णा बनसोडे यांची या पदासाठी निवड त्यांच्या कर्तृत्वाचा सन्मान आहे. पिंपरीचे आमदार म्हणून ते तिसऱ्यांदा निवडून आले असून, त्याआधी महानगरपालिकेत नगरसेवक पदाची हॅटट्रिक त्यांनी केली आहे. तसेच, स्थायी समितीच्या अध्यक्षपदीही त्यांनी उल्लेखनीय कामगिरी केली आहे.

अण्णा बनसोडे यांचा राजकीय प्रवास नगरसेवक, स्थायी समिती अध्यक्ष, आमदार आणि आता उपाध्यक्ष असा चढता राहिला आहे. त्यांच्या निवडीने विधानसभेला सक्षम उपाध्यक्ष मिळाला असून त्यांनी या जबाबदारीतून संविधानिक परंपरेचा सन्मान वाढवावा, अशी अपेक्षा मुख्यमंत्री फडणवीस यांनी यावेळी व्यक्त केली आहे.

अध्यक्ष पदावर विधीतज्ज्ञ अँड राहुल नार्वेकर आणि त्यांच्यासोबत सामाजिक व राजकीय प्रश्नांची जाण असलेला सदस्य हे उपाध्यक्ष म्हणून काम करणार आहेत. आपल्या या अनुभवातून विधानमंडळाचा बहुमान उंचावेल. अध्यक्ष व उपाध्यक्ष या दोघांच्या समन्वयातून या सभागृहाला निश्चितपणे न्याय मिळेल असा विश्वास मुख्यमंत्री फडणवीस यांनी यावेळी व्यक्त केला.

